जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# केडगावचे कोथरुड करण्याचे स्वप्न आहे आणि ते आम्ही पूर्ण करणारच

## ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर, केडगावच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध राहणार असल्याचा ठाम निर्धार



नगर - पुण्यातील कोथरूड या उपनगराचा जसा सर्वांगीण विकास २० वर्षांपूर्वी झाला होता, त्याच धर्तीवर हद्दवाढीत नगर महापालिकेत समावेश झालेल्या केडगाव उपनगराचा विकास व्हावा असे स्वप्न आपण पहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि केडगावचे कोथरुड करण्यासाठीच महापालिकेच्या या निवडणुकीत उतरण्याचा निर्णय कार्यकर्त्यांच्या प्रचंड आग्रहाखातर घेण्यात आला आहे. आमची लढाई ही कोणत्या राजकीय पक्षाविरोधात नसून फक्त केडगावच्या विकासासाठीच आहे, म्हणून आमची अपक्ष आघाडी रिंगणात उतरली असल्याचे ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांनी सांगितले.

महापालिका निवणुकीच्या पार्श्वभूमीवर श्री. कोतकर दैनिक नवा मराठा प्रतिनिधीशी मनमोकळेपणाने संवाद साधला. अनेक प्रश्नांवर त्यांनी रोखठोक भूमिका मांडली. जुन्या आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला.श्री. कोतकर पुढे म्हणाले की, केडगाव हा माझा आत्माच आहे. केडगावच्या सर्वांगिण विकासासाठी यापूर्वी आपण प्रचंड प्रयत्न केले. संदीप कोतकर मनपाचे महापौर असताना त्यांच्या माध्यमातून केडगावसह शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. म्हणूनच तर आजही माजी महापौर संदीप कोतकर यांचे नाव पुढे आले की, केडगावकरांच्या डोळ्यात अश्रू आल्याशिवाय राहत नाही.

### केडगाव योजनेच्या पाण्याची होतेय चोरी

दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून केडगावच्या भल्यासाठी कोतकर कुटूंबियांनी जीवाचा आटापिटा केला, हे सर्वश्रुत आहे. मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या माध्यमातून केडगावसाठी ५५ ते ६० कोटी रुपयांची पाणी योजना आणली होती. सन २०४० पर्यंत ची लोकसंख्या गृहीत धरून ही योजना केली पण दुर्दैवाने या योजनेकडे पुढे गांभिर्याने पाहण्यात आले नाही. या योजनेच्या पाण्याची चोरी होत आहे. परिणामी केडगावकरांना सध्या आठवड्यातून ३ ते ४ दिवसानंतर पाणीपुरवठा होत आहे. म्हणूनच तर केडगाव परिसरात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी आमचे प्रयत्न असतील.

### मी आणि संदीप जे ठरवतो ते करतोच

१५ वर्षांपूर्वी दुर्दैवाने आम्हाला नगर शहराच्या बाहेर जावे लागले. दीर्घ काळ आम्ही केडगाव आणि नगर पासून लांब राहिलो. पण जेव्हा परत आलो तेव्हा पाहिले की, आजही केडगाव परिसरात पाणी, रस्ते, वीज, आरोग्य सुविधा शैक्षणिक सुविधा उत्तम स्वरुपाच्या नाहीत. केडगावचे कोथरुड करण्याचा आपला संकल्प आहे. केडगावचे मुलभूत प्रश्न सोडवून केडगावचे कोथरुड केलेच जाईल, याकरिताच ही लढाई असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. तसेच मी आणि संदीप जे ठरवतो ते करतोच असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### संदीप कोतकरच्या महापौर पदाच्या काळातील कामे अजूनही चर्चेत

२००३ च्या आसपास मनपात केडगावचा समावेश झाला. परिणामी सर्वसामान्यांना न परवडणारे टॅक्स भरावे लागत आहेत. मात्र त्या तुलनेत महापालिकेकडून केडगावसाठी उत्तम सुविधा आजही उपलब्ध झाल्या नाहीत, अशी खंत व्यक्त करून ते म्हणाले की, माजी महापौर संदीप कोतकर यांच्याकडे विश्वासाचे व्हिजन होते. केडगावकरांसह नगरकरांचा विश्वास त्यांनी विकासकामांच्या माध्यमातून संपादित केला होता. म्हणूनच तर सूज्ञ केडगावकरांना आमची आठवण आल्याशिवाय राहत नाही, संदीप कोतकरच्या महापौर पदाच्या काळातील कामे अजूनही चर्चेत आहेत, हा एक प्रकारे केडगावकरांचा मोठा विश्वासच आहे. मनपा निवडणुकीत प्रभाग १६ व १७ मधील स्वाभिमानी मंडळाचे सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्यांनी विजयी होतील, असा दृढ आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.


### जिवाभावाच्या शिलेदारांसाठी निवडणुकीच्या मैदानात

आपण केडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच पद, नगर तालुका पंचायत समिती व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापतीपद भूषविले. सभापतीपदाच्या माध्यमातून राजकारणात वेगळा ठसा उमटवला. कुठल्याही प्रकारचा वारसा नसताना राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याची चुणूक दाखवली. कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायापालट केला. नेप्ती उपबाजार समितीची उभारणी केली. मोठा संघर्ष करून ते राजकीय क्षेत्रात तसेच हॉटेल व्यवसायात पुढे आलो त्याचे कारण म्हणजे सर्वसामान्य जनतेशी असलेले ऋणानुबंध. संघर्षाच्या काळातही आमच्या कोतकर कुटुंबियांच्या पाठीशी ठाम पणे उभ्या राहिलेल्या जिवाभावाच्या माणसांमुळेच आम्ही आहोत. त्यामुळेच त्यांच्या साठी ही लढाई लढत आहोत.

केडगावच्या विकासाचा नवा आराखडा घेऊन प्रभाग क्रमांक १६ मध्ये अ गट विमल दादू कांबळे, ब गट सविता अशोक कराळे, क गट सागर अंजाबापू सातपुते, ड गट भूषण अशोक गुंड, प्रभाग क्रमांक १७ मध्ये अ गट भरत कांबळे, ब गट धनश्री सरोदे, क गट विजया कोतकर, ड गट हर्षवर्धन कोतवर हे निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. केडगावकरांचा स्वाभिमान जिवंत ठेवण्यासाठी ही लढाई आम्ही हाती घेतली आहे, त्यास स्वाभिमानी केडगावकर नक्कीच प्रतिसाद देतील आणि या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करतील, असा विश्वासही भानुदास कोतकर यांनी व्यक्त केला.

---

# चुनीयादेवी आहुजा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - मनोहर बंगला, विनायक पार्क, रावसाहेब पटवर्धन स्मारकामागे टीव्ही सेंटर, सावेडी येथील रहिवासी चुनियादेवी मनोहरलाल आहुजा (वय ९०) यांचे ११ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. १२ जानेवारी रोजी त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे, मुलगी, जावई असा परिवार आहे. त्या राजेंद्र, प्रवीण, विजय आहुजा यांच्या त्या मातोश्री होत.

# डॉ. अरविंद शेळके यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - भिंगार येथील रहिवासी डॉ. बी. आर. आंबेडकर छावणी रुग्णालयाचे सेवानिवृत्त निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.अरविंद जनार्धन शेळके (वय ८७) यांचे १० जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. १२ जानेवारी रोजी नालेगाव अमरधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, बहीण, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कॅन्टोन्मेंट हॉस्पिटल येथे २७ वर्षे त्यांनी सेवा केली.

# नरसय्या काटाबत्तीन यांचे निधन



नगर - श्री श्रमिक बालाजी मंदिराचे मागदर्शक, श्री मार्कंडेय महामुनी पायी दिंडीचे संचालक नरसय्या लिंगय्या काटाबत्तीन (वय ८२) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक जाणीव जपत त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पार्थिवाचे देहदान करण्यात आले.

# पांडुरंग खिंडारे यांचे दु:खद निधन



नगर - बारामती, पुणे येथील रहिवासी पांडुरंग गोविंद खिंडारे (वय ८२) यांचे ११ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तीन हत्ती चौक, बालाजीनगर, कात्रज पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

---

# भरचौकातील दुकान फोडून चोरट्यांनी १५ लाख रुपयांचा ऐवज केला लंपास

नगर - नगर तालुक्यातील निंबळक शिवारातील दत्तमंदिर चौक परिसरात असलेल्या काळुबाई मोबाईल शॉपी अॅण्ड इलेक्ट्रॉनिक दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडून मोबाईल, रोकडसह सुमारे १५ लाख ५४ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नानासाहेब शिवाजी कोतकर (वय ४१) यांनी १० जानेवारी रोजी रात्री फिर्याद दिली आहे. सदरची घटना ९ जानेवारी रोजी रात्री आठ ते १० जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजेच्या दरम्यान घडली आहे. कोतकर यांचे निंबळक गावात दत्तमंदिर चौक परिसरात काळुबाई मोबाईल शॉपी अॅण्ड इलेक्ट्रॉनिक नावाचे दुकान आहे. दिवसभरातील काम संपल्यानंतर त्यांनी शुक्रवारी रात्री आठ वाजता दुकान बंद केले होते. त्यानंतर अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरची कुलूप लावण्याची पट्टी तोडून दुकानात प्रवेश केला.

सामानाची उचकापाचक करून दुकानातील सुमारे १२ लाख रूपये किमतीचे ६५ नग अँड्रॉईड मोबाईल, सुमारे ९४ हजार रूपये किमतीचे ९० की-पॅड मोबाईल, दोन लाख ५० हजार रूपये रोख रक्कम तसेच १० हजार रूपये किंमतीचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर असा एकूण १५ लाख ५४ हजार रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. दरम्यान, दुसऱ्या दिवशी शनिवारी सकाळी नऊ वाजता कोतकर हे दुकानात आले असता त्यांना चोरी झाल्याचा प्रकार लक्षात आला. त्यांनी एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी पोलीस उपअधीक्षक (नगर ग्रामीण) शिरीष वमने, सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी पथकासह भेट दिली. गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. भरचौकात दुकान फोडून १५ लाखांचा ऐवज चोरीला गेल्याने गावात खळबळ उडाली आहे.

# मावा विकणाऱ्यावर पोलिसांची कारवाई

नगर - सुंगधीत तंबाखूपासून मावा तयार करून त्याची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या इसमावर नगर शहर पोलिस उपअधिक्षकांच्या पथकाने कारवाई केली आहे. या कारवाईत सुमारे ४४ हजार ५५० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. १० जानेवारी रोजी कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील रेल्वे स्टेशन रस्ता, बोहरी चाळ येथील एका राहत्या घराच्या पडवीत ही कारवाई करण्यात आली. येथे प्रमोद अशोक कांबळे (वय ३८) हा इसम सुंगधीत तंबाखूपासून मावा तयार करून त्याची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने छापा टाकला.

# नगरमध्ये शिक्षकाचे घर फोडून रोख रक्कम व दागिन्यांची चोरी

नगर - शहरातील वसंत टेकडी परिसरात एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत निलेश दत्तात्रय भालेराव (वय ५१, रा. स्टेट बँक कॉलनी, वीर सावरकर मार्ग, वसंत टेकडी)यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे शिक्षक आहेत. ते ९ जानेवारी रोजी रात्री आपल्या कुटुंबासह अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी गेले होते. १० जानेवारी रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास त्यांच्या शेजारी राहणारे ऋषिकेश मोडक यांनी भालेराव यांना फोन करून त्यांच्या घरात चोरी झाल्याची माहिती दिली.

भालेराव यांनी तातडीने अहिल्यानगर गाठून घराची पाहणी केली असता, दरवाजाचा कडीकोंडा तुटलेला दिसला. घरातील बेडरूममधील कपाटाचे लॉकर तोडून चोरट्याने ३० हजार रुपये किमतीची ६०० ग्रॅम चांदीची उपकरणे आणि २५ हजार रुपये रोख असा एकूण ५५ हजार रुपयांचा ऐवजी लंपास केला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण केले होते.

निलेश भालेराव यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवला असून पोलीस हवालदार गोसावी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

---

ज्येष्ठ साहित्यिक

# रतनलाल सोनग्रा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील ज्येष्ठ साहित्यिक, संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष रतनलाल सोनग्रा (हल्ली रा.२०१, सहारा एनक्लेव्ह, विमाननगर, पुणे, वय ८७) यांचे ११ जानेवारी रोजी पुणे येथे खासगी रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील येरवडा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ५ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

# मुरलीधर पवार यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील रयत शिक्षण संस्थेचे अशोकनगर येथील भास्करराव पाटील गलांडे माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुरलीधर रामभाऊ पवार (वय ७१) यांचे ११ जानेवारी रोजी अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, एक मुलगी,सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. अशोक पवार यांचे थोरले बंधू, स्टेट बँकेचे कॅशियर राहुल पवार व टिळकनगर इंडस्ट्रीजचे क्वालिटी सुपरवायझर महिंद्र पवार यांचे वडील, निखिल, अनिकेत व प्रवीण पवार यांचे चुलते होत.

# रणजीत शेळके यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील ललकार टेन्ट हाऊसचे मालक रणजीत सूर्यभान शेळके (वय ५३) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, चुलते, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

श्रीरामपूर नगर पालिकेचे सेवानिवृत्त हेडक्लार्क एस.व्ही. शेळके यांचे चिरंजीव, रामेश्वर विष्णु शेळके यांचे पुतणे, चि.अमित शेळके यांचे वडील होत.

# अनुसयाबाई कोकाटे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी गं.भा. अनुसयाबाई श्रीपती कोकाटे (वय १०८) यांचे ११ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, पंतू, नातवंडे असा परिवार आहे. रामभाऊ, रावसाहेब, अर्जुन, बाळासाहेब कोकाटे यांच्या त्या मातोश्री होत दिलीप कोकाटे यांच्या आजी होत.

---

# फेज २ पाणी योजना १५ वर्षांपासून रखडलीय, याला जबाबदार कोण?

नगर - अहिल्यानगर शहराला पाणीपुरवठा सुरळीत, नियमित होण्यासाठी फेज २ चे काम सुरू करण्याचा निर्णय जून २०१० मध्ये घेण्यात आला. हे काम तीन वर्षात २०१४ पर्यंत पूर्ण व्हावे असे अपेक्षित होते. २०२६ उजाडले तरीही हे काम अर्धवट स्थितीत आहे. एखादी योजना पंधरा वर्षे रखडत असेल तर ते पाप महानगरपालिका, लोकप्रतिनिधी आणि नगरसेवक यांचे आहे असे म्हंटले तर चुकीचे ठरणार नाही असे मत शिरीष बापट यांनी व्यक्त केले आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, फेज २ ची पाइपलाईन शहरातील ज्या भागात टाकण्यात आली, त्या भागातील घरमालकांनी एका नळजोडणीसाठी ४-५ हजार या ठेकेदारांना दिले. अजूनही त्या भागाला फेज २ चा पाणी पुरवठा नाही. या फेज २ ची माहिती मनपाच्या संबंधित अधिका-याला विचारली असता त्यांनी हे ६० टक्के काम पुर्ण होऊन पाणी पुरवठा सुरु झाल्याचे सांगितले.यातील खरे-खोटे किती हे त्याला आणि नागरिकांनाच माहित?

फेज २ चे ६० टक्के काम पूर्ण होण्यास २०२६ उजाडत असेल तर १०० टक्के काम पूर्ण होण्यास २०३५ उजाडेल.अर्थात शहरातील जनता तेवढा वेळ त्यांना देतील कारण आपण फारच सोशिक आहोत.यामुळेच आपण काम न करणारे लोकप्रतिनिधी व नगरसेवक वर्षोनुवर्षे निवडून देत आहोत. आपण कोणीच त्यांना जाब विचारत नाहीत.कोणी विचारण्याचा प्रयत्न केला तर, तुम्ही आता पुण्याला स्थायिक झाला. तुमचा नगरशी काय संबंध असा प्रश्न विचारतात.

आई-वडिलांची मुलं कितीही कुरुप असली तरी आई-वडिल त्याच्या कुरुपतेत सौंदर्य शोधण्याचा प्रयत्न करतात.आपले शहर कसेही असले तरी या शहरावर आपले प्रेम आहे.या शहराने आमच्यावर प्रेम केले,संस्कार केले,मित्र दिले,आमच्या व्यवसायातून आमची उपजिविका झाली.सामाजिक क्षेत्रात काम करताना जे शक्य होईल ते सर्व नगरकरांनी दिले.त्याची जाण ठेऊन पुण्यात असलो तरी आपल्या शहराचा विकास व्हावा,शहराला चांगले दिवस यावे यासाठी प्रयत्न करीत राहणार आहे.असो.

### या योजनेला भवितव्य नाही

फेज २ बाबत मनपाच्या एका निवृत्त अधिका-याशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, या योजनेला भवितव्य नाही. कधी पूर्ण होऊन शहराला दररोज, नियमित दाबाने पाणीपुरवठा होईल हे कोणताही अधिकारी सांगू शकणार नाही.याचे मुख्य कारण शासकिय अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी नगरकरांमध्ये दम नाही हे कधीच ओळखले आहे.तसे नसते तर फेज २ चे काम तसेच सावेडी उपनगरातील नाट्यगृह कधीच बांधून पूर्ण झाले असते.ते कामही १५ वर्षे रखडले आहे.मनपाचे एकमेव देशपांडे हॉस्पीटलची अवस्था बिघडत चालली आहे. नेहरु मार्केटचे बांधकाम कधी सुरु होईल ते कोणीही सांगू शकत नाही. फेज २ च्या अपूर्ण अवस्थेत असलेल्या पाइपलाइन, सिमेंट रस्त्यात गाडल्या जात आहेत.

### मतदान करताना विचारपूर्वक करा

१५ जानेवारीला होणाऱ्या मनपा निवडणुकीत प्रत्येक मतदाराला मतदान यंत्रावरील चार बटन दाबून आपला मतदाना हक्क बजवायचा आहे. चारही उमेदवार मान्य असतील तर त्यांना मतदान करा. पण मान्य नसतील तर मतदान यंत्रावरील शेवटचे बटन नोटा दाबून मला यातील एकही उमेदवार मान्य नाही याची नोंद करा. भविष्यात नोटावर होणारे जास्तीत जास्त मतदानाची निवडणूक आयोग, न्यायालय दखल घेईल हे निश्चित.निवडणूक कायद्यात बदल होणे आवश्यक असून मतदारांनी रेटा दिल्याशिवाय हे होणार नाही. निवडणूक आयोग स्वतः काही करेल हे आज तरी शक्य नाही.

पुन्हा एकदा विनंती की जास्तीत जास्त मतदान करा.मतदानाची टक्केवारी वाढवा.उमेदवार मान्य नाही म्हणून घरात बसू नका.मतदान यंत्रावरील नोटाचे बटन ही आपल्याला सर्वोच्च न्यायालयाने दिलेली एक संधी आहे. उमेदवार मान्य असेल तर त्याला मतदान करा. मान्य नसेल तर नोटा दाबा.भविष्यात नोटावर होणा-या मतदानाची दखल सर्वच राजकीय पक्ष घेतील.अभ्यासू, पक्षाशी प्रामाणिक कार्यकर्त्यांना पुढील काळात उमेदवारी देतील अशी आशा करु या असे शिरीष बापट यांनी म्हंटले आहे.

---

# युवकावर तिघांकडून लोखंडी रॉडने हल्ला

नगर - मनमाड रस्त्यावरील विखे पाटील हॉस्पिटल परिसरात चहा टपरीजवळ युवकावर लोखंडी रॉड व खुर्चीने हल्ला केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लकी राहुल वैराळ (वय १९, रा. विळदघाट, ता. नगर) असे हल्ला झालेल्या युवकाचे नाव आहे. त्याने फिर्याद दिली आहे.

पप्पू उर्फ रमेश आव्हाड (रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी), राहुल बडे व अरबाज शेख (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द १० जानेवारी रोजी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ जानेवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी युवक तेथे उभा असताना संशयित आरोपींनी त्याच्याशी वाद घातला. छेड काढल्याच्या कारणातून संशयित आरोपींनी फिर्यादीवर हल्ला केला. आव्हाड याने हातातील लोखंडी रॉडने, राहुलने खुर्चीने तर शेख यानेही मारहाण करत शिवीगाळ केली व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीत नमूद केले आहे.

# सुधाकर (भाऊ) तिडके यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - सुवर्ण पिंपळ, मोरगेवस्ती, वॉर्ड नं.७, नवशक्ती चौक जवळ, श्रीरामपूर येथील रहिवासी सुधाकर (भाऊ) संभाजी तिडके (वय ६८) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, एक मुलगा, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बांधकाम व्यावसायिक दिनकर (आप्पा) तिडके यांचे धाकटे बंधू, ओमसाई किराणाचे मालक रमेश तिडके यांचे वडील, बबन व गणेश तिडके यांचे चुलते होत.

---

# जैन गुरू भगवंतांना महाराष्ट्रात विहार दरम्यान पोलिस सुरक्षा

## मिशन सेफ विहार ग्रुपच्याने मानले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

नगर - जैन गुरू भगवंतांना महाराष्ट्रात विहार दरम्यान पोलिस सुरक्षा मिळण्याची मागणी केली. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ सर्व पोलिस अधीक्षकांना सूचना देत जैन गुरूंना पोलिस संरक्षण दिले आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर आले असता मिशन सेफ विहार ग्रुप अध्यक्ष इंजी.यश प्रमोद शहा यांनी प्रत्यक्ष भेट घेत त्यांचे आभार व्यक्त केले.



मिशन सेफ विहार ग्रुपचे अध्यक्ष इंजी.यश प्रमोद शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत विहार दरम्यान महाराष्ट्रात जैन गुरू भगवंतांना पोलिस सुरक्षा मिळत असल्याबद्दल आभार मानले.

चातुर्मास संपल्यावर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात विहार पदभ्रमण मोठ्या प्रमाणात होत आहे. मिशन सेफ विहार ग्रुपच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात विहार पदभ्रमण दरम्यान पोलिस सुरक्षा साठी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलिस महासंचालक कार्यालय,अल्पसंख्यांक मंत्रालय, जिल्हा प्रशासन यांना याबाबत निवेदन पत्र दिले होते.त्यानुसार विनंती मान्य करत मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार गृह विभाग, महाराष्ट्र पोलिस, जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने विहार दरम्यान सकल जैन समाजातील गुरूभगवंत यांना विहार पदभ्रमण दरम्यान पोलीस सुरक्षा संपूर्ण महाराष्ट्रात दिली जात आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चारही पंथांच्या सर्व समुदायाच्या साधू साध्वी गुरूभगवंत आणि सकल जैन समाजाच्या वतीने मिशन सेफ विहार ग्रुप अध्यक्ष जीनशासन सेवक यश शहा यांनी जैन गुरू भगवंत यांचे अनुमोदनपर आभार पत्र, विहार दरम्यानचे पोलीस सुरक्षा फोटो फ्रेम आणि पोलीस सुरक्षा मिशन सेफ विहार पुस्तिका यावेळी भेट देत महाराष्ट्र सरकार आणि गृह विभाग, महाराष्ट्र पोलिस प्रशासन सर्वांचे आभार मानले.

महाराष्ट्र राज्याला साधू संतांची भूमी म्हणून विशेष ओळख आहे. त्यांच्या सुरक्षेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार मध्ये विशेष लक्ष दिले जात असल्याचे समाधान चारही पंथांच्या सर्व सम दायाच्या साधू साध्वी गुरूभगवंत यांना असल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. जैन गुरु भगवंतांना विहार दरम्यान सकाळ व संध्याकाळच्या दोन्ही विहार पदभ्रमण दरम्यान आवश्यकतेनुसार मागणीप्रमाणे पोलिस सुरक्षा मिळत असल्याने विहार सुखसाता पूर्वक,निर्विघ्न पार पाडण्यास फार मोठे सहकार्य मिळत आहे .

तसेच विहार दरम्यान गुरु भगवंत यांना पोलीस सुरक्षा व्हॅन असल्या कारणानेच अलीकडेच काही अपघात होता होता राहिले आणि मोठी दुर्घटना टळली याची माहिती मुख्यमंत्री यांना शहा यांनी दिली. विहार दरम्यान पोलीस सुरक्षा व्हॅन महत्त्वाची असल्या कारणाने आपण तत्काळ महाराष्ट्र पोलिस प्रशासन यांना अधिक प्रभावीपणे पदभ्रमण दरम्यान पोलिस सुरक्षा व्हॅन सह सर्व ठिकाणी द्यावी ही विनंती देखील यावेळी केली.

# गृहिणी

## आरोग्य

### रडणे एक सामान्य क्रिया

रडणे ही मानवाची एक सामान्य क्रिया आहे, जी अनेक वेगवेगळ्या भावनांमुळे उत्तेजित होते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की माणसं का रडतात? संशोधकांना संशोधनात असे आढळून आले आहे की, रडण्याने आपले शरीर आणि मन या दोन्हींचा फायदा होतो. रडल्याने पॅरा-सिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय होते, जे मन शांत करते आणि पचन सुधारते. लाइसोझाइम नावाचा पदार्थ अश्रूंमध्ये आढळतो. हे डोळ्यांतील बॅक्टेरिया काढून टाकून डोळ्यांना शांत करते. रडल्याने शरीरातील एंडोर्फिन, ल्युसीन एन्कार्फेलिन, प्रोलॅक्टिन सारख्या घटकांची पातळी कमी होते, ज्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होते. रडल्याने तुमचे दुःख कमी होऊन आराम मिळतो. रडल्यानंतर तुम्हाला हलके वाटते आणि आनंदी वाटते. जेव्हा दुःखी असता तेव्हा नैराश्यामुळे शरीरात हानिकारक घटक तयार होतात. जेव्हा आपण रडतो तेव्हा हे घटक शरीरातून बाहेर पडतात. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी रडणे फायदेशीर आहे, ते रक्तदाब सामान्य करण्यासाठी उपयुक्त आहे.

## पाककला

### चविष्ट चिक्की

**साहित्य :** १/२ कप तीळ, २५० ग्रॅम – साजूक तूप, १ कप – गूळ, १/४ कप- काजू (चिरलेला), १/२ टीस्पून- वेलची पावडर, १ कप – नारळ, १ कप – बदाम

**कृती :** गुळाचे तुकडे करून तीळ स्वच्छ करून घ्या. सोबतच सर्व ड्रायफ्रुट्स चिरून एका भांड्यात ठेवा. गॅसवर एक कढई गरम करण्यासाठी ठेवा. कढई गरम झाल्यावर त्यात १ ते२चमचे साजूक तूप घालून सर्व काजू भाजून घ्या. नंतर त्याच पातेल्यात ५ चमचे तूप टाकून ते वितळवून घ्या.तुपातून धूर निघू लागल्यावर त्यात तीळ टाकून हलके परतून गॅस बंद करा. आता आपण तीळ थंड होण्यासाठी ठेवा. नंतर कढईत ५ चमचे तूप घालून गरम करा. आता त्यात गुळाचे छोटे तुकडे टाका आणि गूळ वितळवून घ्या. गुळाला ढवळत राहा.यानंतर, त्यात तीळ घालून ३० सेकंद ढवळत राहा. नंतर त्यात काजू, वेलची पूड , नारळ घालून सुमारे १० मिनिटे शिजू द्या. गूळ आणि तीळ नीट शिजायला लागल्यावर गॅस बंद करून तूप लावलेल्या प्लेटवर पसरवा. सांचे असल्यास, ते देखील वापरले जाऊ शकते. २ मिनिटांनी तीळ बर्फी किंवा चिक्कीच्या आकारात कापून घ्या. आता पूर्णपणे थंड होऊ द्या आणि चाकूच्या मदतीने चिक्की बाहेर काढा.

## वास्तू

### नजरेपासून करा बचाव

स्वतःवरील वाईट नजर काढण्यासाठी, प्रथम शांत ठिकाणी बसा. नंतर उजव्या हातात मीठ घ्या. आता तुमचा हात डोक्यापासून पायापर्यंत सात वेळा घड्याळाच्या उलट दिशेने हलवा. शेवटी मीठ वाहत्या पाण्यात ओता. ही पद्धत वाईट नजरेपासून बचाव करू शकते.

## सौंदर्य

फोडणीत जिरे-मोहरी तडतडल्यावर लगेच हिंग आणि नंतर इतर मसाले घाला. यामुळे फोडणीला छान चव येते.

## सल्ला

संक्रांतीला वाण देण्यासाठी फळे किंवा भाज्या ठेवण्यासाठी वापरता येणारी नेट बॅग, खणाचे पाऊच अशा गोष्टी उपयुक्त आहेत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६

**भोगी, धनुर्मास समाप्ति, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, विशाखा २४।०७, सूर्योदय ०६ वा. ४११ मि. सूर्यास्त ०५ वा. २७ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** काही अडचणींनंतर यश मिळेल. व्यापार व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**वृषभ :** आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**मिथुन :** कौटुंबिक विषयांमध्ये काळजी घ्या. नोकरदार व्यक्तींनी कार्यात सावधगिरी बाळगावी. महत्वाकांक्षा पूर्ण झाल्यामुळे आनंद वाटेल.

**कर्क :** आपल्या कौटुंबिक तणावांचा समस्यांचा प्रभाव आपल्या कार्यावर होऊ देऊ नका. नोकरीपेशा व्यक्तींसाठी कामात स्थिती सुखदायक राहील. व्यापार-व्यवसायात आर्थिक लाभ मिळेल.

**सिंह :** यथायोग्य विचार करून कामे करा. कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील. काही महत्वपूर्ण प्रश्नांची सोडवणूक होण्याची शक्यता आहे. शत्रू वर्ग पराभूत होईल.

**कन्या :** बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील.

**तूळ :** दिवस चांगला आहे. आपल्या छान वागण्याने इतरांना हवेहवेसे वाटू शकता. शेयरच्या विषयामध्ये सावधगिरी बाळगा.

**वृश्चिक :** मित्रांबरोबर सामुदायिक उपक्रम किंवा पिकनिकच्या रूपात दिवसाचा आनंद घेऊ शकता. पत्नी व मुलांचा सहवास लाभेल.

**धनु :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल वार्ता मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे.


**मकर :** आज पैसे आणि बळाची विशेष भूमिका राहील. केव्हातरी एखाद्या सामाजिक समारंभात आपल्या विचारांचा परिणाम होईल.

**कुंभ :** महत्वाच्या बातम्या मिळाल्याने आपण एक सुखद परिस्थितीत आपणास बघाल. पत्नी व मुलांचा सहवास लाभेल.

**मीन :** जवळच्या नात्याचा आनंद घेण्यावर आपले चित्त एकाग्र करा. स्वार्थी बनू नका. दिवस आनंदात जाईल. व्यापारिक करार व व्यवहारात सावधगिरी बाळगा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३४५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) तानाजी मालुसरे यांनी कोंडाणा किल्ला चढण्यासाठी या प्राण्याचा वापर केला असे म्हणतात ६) टाळी ९) उसंत; फुरसत ११) ज्याअर्थी; तापामुळे तोंडापाशी उठणाऱ्या बारीक पुटकुळ्या १२) मूल्य न देता; फुकट १४) एक फळ १५) जंगलाला लागलेली आग; वणवा १७) मीटिंग; बैठक १८) घरातील सांडपाणी काढून देण्याची वाट १९) गेलेला; भूत; अवस्था; दशा २०) वेढा; विळखा ; वेटाळे २२) अनेक वस्तू एकत्र करणे किंवा जमविणे

**उभे शब्द :-** १) एक प्रकारचा विषारी साप २) घट्ट धरून ठेवण्याचे हत्यार; चिमटा ३) भय; भीती ४) किंमत; मूल्य ५) विरजलेल्या दुधातले पाणी काढून त्यात मीठ वगैरे घालून केलेले खाद्य ७) एखाद्याची बाजू घेणे; वकिली; पक्षपात ८) झेंडा; पताका; निशाण १०) एक प्रकारचे साधे जेवण १३) ज्यावर पोळी, भाकरी वगैरे भाजली जाते ते पात्र १४) फशी पडलेल्याची स्थिती; फजिती १६) लहान मुलांचा एक खेळ १८) अभियान २०) हत्ती; सळई; कांब २१) अयोध्येचा राजा; सीतापती

### शब्दगंध क्र. ७३४४ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आयुष्यात जोकर म्हणून जगता आले पाहिजे कारण जास्त शहाणपणा तोटा करुन जातो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### खोलीत रूम हीटरसोबत पाण्याची बादली ठेवणे का महत्त्वाचे आहे?

सध्या संपूर्ण भारतात खूप थंडी आहे. अनेक घरे उबदार राहण्यासाठी विविध पर्यायांचा वापर करत आहेत. हिवाळ्यात उबदार राहण्यासाठी रूम हीटर वापरणे सामान्य आहे. पण तुम्हाला माहित आहे का की हीटरसोबत खोलीत पाण्याची बादली ठेवण्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे?

रूम हीटर केवळ हवा गरम करत नाही तर त्यातील ओलावा देखील शोषून घेतो. यामुळे हवा कोरडी होते, ज्यामुळे आपली त्वचा, नाक आणि घसा कोरडा वाटतो.

कोरड्या हवेमुळे त्वचा कोरडी आणि भेगा पडू शकते. यामुळे खाज सुटणे, ॲलर्जी आणि इतर त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. कोरड्या हवेमुळे श्वास घेणे कठीण होऊ शकते, विशेषतः दमा आणि ॲलर्जी ग्रस्तांसाठी. कोरड्या हवेमुळे नाक आणि घशात कोरडेपणा आणि जळजळ होते. कोरड्या हवेमुळे डोळ्यांची जळजळ आणि कोरडेपणा येऊ शकतो.

जेव्हा आपण हीटर असलेल्या खोलीत पाण्याची बादली ठेवतो तेव्हा पाणी हळूहळू बाष्पीभवन होते. या बाष्पामुळे खोलीतील आर्द्रता वाढते, ज्यामुळे हवा मऊ आणि आरामदायी बनते. पाण्याच्या बादल्या खोलीत आर्द्रता पातळी राखण्यास मदत करतात. बाष्पीभवन झालेले पाणी त्वचेला मॉइश्चरायझ करते, ती निरोगी ठेवते. ओलसर हवा श्वास घेण्यास सोपी असते. ओलसर हवा डोळ्यांना आराम देते.

ह्युमिडिफायर हे एक उपकरण आहे जे हवेतील आर्द्रता वाढवते. वनस्पती हवेतील आर्द्रता वाढवण्यास देखील मदत करतात. खोलीत ओले कपडे लटकवल्याने हवेतील आर्द्रता देखील वाढू शकते. हिवाळ्यातही तुमच्या त्वचेची आणि आरोग्याची काळजी घेण्यासाठी रूम हीटरजवळ पाण्याची बादली ठेवणे हा एक सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. यामुळे तुमची त्वचा निरोगी राहतेच, शिवाय श्वास घेणे देखील सोपे होते.

### बक्षीस

राजा अकबर बिरबलाच्या हजरजबाबीचे खूप कौतुक करायचे. एके दिवशी त्यांनी राज्यसभेत बिरबलाचे भरभरून कौतुक करून बिरबलाला काही बक्षिसे देण्याची घोषणा केली. बरेच दिवस झाल्यावर बिरबलाला बक्षीस काही मिळाले नाही. बिरबलाला प्रश्न पडला की आता राजाला बक्षिसाची आठवण कशी करून द्यावी? एके दिवशी महाराज अकबर यमुनेच्या काठी संध्याकाळी फिरायला निघाले. बिरबल त्यांच्या समवेत होते. अकबराने तेथे एका उंटाला फिरताना बघितले. अकबराने बिरबलाला विचारले,

'बिरबल सांगा की ह्या उंटाची मान वाकडी कशाला आहे?' बिरबलाने विचार केला की महाराजांना त्यांच्या वचनाची आठवण करून देण्याची हीच संधी आहे', त्यांनी उत्तर दिले की महाराज हा उंट देखील एखाद्याला वचन देऊन विसरला होता, ज्यामुळे त्याची मान वाकडी झाली.

महाराज, असे म्हणतात की जे कोणी आपल्या वचनाला देऊन विसरून जातो त्याची मान अशा प्रकारे वाकडी होते. त्यांना देव अशी शिक्षा देतो ही एक प्रकाराची शिक्षाच आहे. अकबराला त्वरितच लक्षात येत की ते देखील बिरबलाला दिलेले वचन विसरलेले आहे. त्यांनी बिरबलाला त्याच क्षणी त्यांच्या सह महालात येणाचे सांगितले आणि महालात पोहोचतात बिरबलाला त्याचे बक्षीस म्हणून काही धनराशी दिली आणि म्हणतात की आता माझी मान तर उंटाप्रमाणे वाकडी होणार नाही न? बिरबल आणि असे म्हणून ते आपले हसू थांबवू शकले नाही. अशा प्रकारे बिरबलाने चातुर्याने न मागता आपले बक्षीस राजा कडून मिळविले.

बोध : चतुराईने आपला हेतू साध्य करावा.

## जीवन का अमृत (भाग १)



को देखने वाले बन जायेंगे। गुरु-शक्ति आपको कभी नहीं छोड़ेगी। मैं आपके प्रेम की कद्र करता हूँ। जब आप पवित्र आवाज़ को सुनें, तो आप इसके स्रोत को जानने के लिए इसका पीछा न करें क्योंकि इससे यह मंद हो जाएगी। आप केवल अपने दिव्य-चक्षु पर एकाग्रता से इसे सुनते रहें। यह पास आ जाएगी, तीव्र हो जाएगी और अंत में ऊपर से आने लगेगी। ज्योति के मध्य में अंदरूनी नजर को टिकाकर आप प्रेम से इसमें प्रवेश करें। यह और तेज हो जाएगी और फूटकर, सत्गुरु की दया से, आगे का रास्ता दे देगी।

कृपया प्रेम, प्रगाढ़ श्रद्धा और पवित्र उत्साह के साथ अपने भजन- सिमरन में लगे रहें। आपके सिर पर निरन्तर कार्यरत गुरु-शक्ति आपको हर संभव सहायता, दया और सुरक्षा प्रदान करेगी १

आध्यात्मिक जिज्ञासु कभी-कभार भजन- सिमरन में जो सूखेपन का दौर पाते हैं, वह एक

### उनका आशिर्वाद

छुपा हुआ आशीर्वाद है, जिससे आपकी आंतरिक भक्ति का विकास होता है। आप इसकी चिंता न करें, बल्कि अपने भजन- सिमरन में उत्साह के साथ लगे रहें, एक नई ताजगी और शक्ति के साथ। दयालु गुरु-शक्ति आपको हर संभव सहायता, दया और सुरक्षा प्रदान करेगी।

आप दिव्य चक्षु पर टिककर तनाव मुक्त हो जाएँ तथा धैर्य और दृढ़ता से इंतजार करें। कभी-कभी ऐसा होता है कि जब एक या दूसरी वस्तु को पाने की नामलेवा की चाह बहुत तीव्र हो जाती है, तो ऐसा सूखेपन का दौर बीच में आ जाता है। आप इसके बारे में चिंता न करें ।

यह संभव है कि जल्द ही आपको तीव्र रोशनी के अंदर सत्गुरु नूरी स्वरूप के दर्शन हों। आप प्रेम और उत्साह से सिमरन करते रहें । आपने यह नहीं लिखा, कि आप किस प्रकार की आवाज़ अंतर में सुनते हो । पाँच पवित्र नाम सिद्ध (आभिमंत्रित) होते हैं और इनमें सत्गुरु की जिंदगी का उभार होता है। दृढ़ विश्वास और एकाग्र मन से किया गया इनका जाप उसकी दया और आशीर्वाद को जगाता है।

दायी ओर से आने वाली पवित्र शब्द धुन को भी सुनना इतना ही जरूरी है और इसके लिए बराबर का समय देना चाहिए। यह सुनी जाने वाली जिंदगी की धारा है और इसको नियमित रूप से सुनने से आपको असीम शांति का आशीर्वाद मिलेगा।

मुझे खुशी है कि आप तरक्की कर रहे हैं और अंतर में सत्गुरु आपको हर क्षेत्र में सहायता दे रहा है। मैं चाहता हूँ कि आप रोजाना अंतर में जाएँ ओर स्वर्ग की ज्योति एवं सत्गुरु की ज्योति देखें। रोजाना नियमित अभ्यासों से आपको यह तरक्की मिलेगी। आप सिर्फ यह करें कि एक अवस्था में बैठ जाएँ और अंतर में जो कुछ भी दिखे, अँधेरा या प्रकाश, उसके बीच में टकटकी लगाकर देखते जाएँ बाकी सब सत्गुरु का काम है,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

मूर्ख समझदार तथा विद्वान लोगों के साथ रह कर विद्वान बन जाता है। बुद्धिमान मूर्खों के साथ रह कर मूर्ख बन जाता है। अच्छे विचार और अच्छी संगति व्यक्ति में हिम्मत और सकारात्मकता का भाव लाती है। समाज के निर्णय में, मनुष्य के निर्माण में अच्छी संगति का योगदान होता है। अच्छी संगति बुद्धि को प्रखर बनाती है। अच्छी संगति वाणी में मिठास लाती है। अच्छी संगति व्यक्ति को निर्भय बनाती है। अच्छी संगति व्यक्ति को प्रेरणा देती है। अच्छी संगति व्यक्ति के जीवन की दिशा बदल देती है।

आज्ञा चक्र -७३- मन - संगति का प्रभाव स्पन्ज की तरह - हमारा मन स्पन्ज की तरह है। हम वह सब कुछ सोख लेते हैं जो हमारे आस पास के लोग हमारे बारे सोच रहे होते हैं। अगर हमारे आस पास नेगेटिव दृष्टिकोण रखने वाले लोग रहते हैं तो हमारा मन

उन्हे पकड़ लेता है। हम बहुत असहज महसूस

### संत संगती

करने लगते हैं। उनके नाकारात्मक विचार हमारी शक्ति चूस लेते हैं। हम भी बुरा बुरा सोचने लगते हैं। घुटन महसूस होने लगती है। वहां से भाग जाने को मन करता है। अगर हमारे आस पास के लोग पॉजिटिव सोच के होते हैं। जब हम उनके आस पास होते हैं तो हम उनके मनोभावों को ग्रहण कर लेते हैं। हम शक्तिशाली महसूस करते हैं। अपने लक्ष्यों को शीघ्रता से सम्पन्न करने को तैयार होते हैं।

हमारा मन बार बार दोहराई गई बातों को विचारता रहता है। वह भेद नहीं करता कि संदेश अच्छा है या बुरा। जब हम किसी बात को बार बार सुनते हैं तो उस पर विश्वास करने लगते हैं। हम ने गीत सुना। उस गीत को कुछ दिन तक सुनते रहें तो हम उस गाने को गुनगुनाने लगते हैं। सफलता के विचार मन में बार बार आते रहें तो हम सफलता की राह पर बढ़ने लगते हैं।

आज के युग में हम चारों तरफ से नकारात्मक लोगों से घिरे रहते हैं, वह चाहे घर हो, कार्य स्थल हो या कोई समूह जिनसे हम अपनी अपनी रुचि अनुसार जुड़े रहते हैं। हम न घर को छोड़ सकते हैं न नौकरी छोड़ सकते हैं और न ही समूह को छोड़ सकते हैं। परंतु नकारात्मक साथी समय समय पर मुख से व्यर्थ बोलने लगाते हैं, वह अपना कर्तव्य नहीं निभाते, हमें तनाव देते रहते हैं। जो लक्ष्य हम ने लिया है वह दूर दिखने लगता है। कई बार ये लोग बोलते कुछ नहीं परंतु निरंतर मन से हमारा विरोध करते रहते हैं और पीठ पीछे निन्दा करते हैं। कहने को कहते हैं कि हम सब भाई भाई हैं परंतु सोच, बोल और कर्म अलग होते हैं। ऐसी कोई भी नकारात्मक स्थिति कहीं पर भी आये तो उस से बचने और आगे बढ़ने का एक ही सब से बढ़िया तरीका है कि आप

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : मला तबला घेऊन द्या ना
वडील : मुळीच नाही तू घरच्यांना त्रास देशील
मुलगा : नाही देणार बाबा सगळे झोपले की वाजवणार

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या राज्याच्या फॉरेस्ट प्रोजेक्टला एसकेओसीएच पुरस्काराने गौरवण्यात आले आहे? – नागालँड

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

चहा जितका जास्त प्रमाणात उकळला जातो, तितके अधिक टॅनिक ॲसिड चहामध्ये उतरते.

चहा करण्याची पद्धत :

चहा करण्याची योग्य पद्धत म्हणजे पातेल्यात पाणी उकळून घ्यावे. त्यानंतर गॅस बंद करून उकळलेल्या पाण्यामध्ये चहाच्या वाळलेल्या पानांचा चुरा टाकावा व त्यावर पाच मिनिटांसाठी झाकण ठेवावे. हे चहाचे पाणी गाळून घेऊन साखर व दूध एकत्र करावे. अशा पद्धतीने बनविलेला चहा फक्त अर्धा कप घ्यावा. हा चहा प्याल्याने मज्जासंस्थेला उत्तेजना मिळून शरीराचा थकवा दूर होतो व उत्साह वाढतो.

चहाचे दुष्परिणाम :

काही लोक नकळत दिवसातून खूप वेळा चहा पितात व काही दिवसांनी त्याचे व्यसनच जडते. चहा प्याल्याशिवाय कामच करता येत नाही, अशी बऱ्याचजणांची तक्रार असते. परंतु आणखी त्यामध्ये

### चहा

साखर मिसळली जाऊन चहामधील सर्व पोषणमूल्ये नष्ट होतात व उरते फक्त रासायनिक द्रव्य! या चहा व साखरेमुळे शरीराची हानी मोठ्या प्रमाणात होते.

उदाहरणार्थ :

यकृतात निर्माण होणाऱ्या स्रावाला हानी पोहोचते. त्यामुळे यकृताचे व पित्ताशयाचे आजार जडतात.

२) रक्तवाहिन्या लवचीक न राहता त्यांच्यात काठीण्य निर्माण होते. त्यामुळे शरीराला रसरक्त पुरवठा करण्यास अडथळा निर्माण होतो व यातूनच रक्तदाब, हाय कोलेस्टेरॉल, हृदयविकार, लठ्ठपणा हे आजार निर्माण होतात.

३) अति चहा प्याल्यामुळे आम्लपित्ताचा त्रास सुरू होतो.

४) अति चहामुळे गुदभागातील रक्तवाहिन्यांमध्ये काठीण्य निर्माण होऊन त्या तुटतात व मूळव्याधीची निर्मिती होते.

५) अति चहा प्याल्यामुळे शरीरात लोहाचे व कॅल्शिअमचे शोषण कमी होते व त्यामुळेच रक्ताल्पता (ॲनिमिया) व हाडांचा ठिसूळपणा (ऑस्टिओपोरॉसिस) हे विकार जडतात.

६) अति चहामुळे शरीरातील सर्व रक्तवाहिन्यांम ध्ये काठीण्य निर्माण होऊन रसरक्तपुरवठा व्यवस्थित होत नाही व त्यातूनच व्हेरिकोज व्हेन्स (शिरांमध्ये रक्त साकळून राहणे) हा आजार निर्माण होतो. त्याप्रमाणे छातीत धडधडणे, निद्रानाश हेही विकार जडतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# थोरांचे व्यक्तिमत्व ही पुस्तकात न मावणारी व प्रेरणा देणारी असतात

## डॉ. सागर देशपांडे यांचे प्रतिपादन; ज्ञानसंपदा व्याख्यानमाला पहिले पुष्प



ज्ञानसंपदा स्कूल आयोजित १५ व्या ज्ञानसंपदा व्याख्यानमालेचे उदघाटन करताना जडणघडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे. समवेत मानद सचिव अरूण कुलकर्णी, विश्वस्त श्रीहरी टिपूगुडे आदी. (छाया – उदय जोशी)

नगर – संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, आचार्य अत्रे, स्वामी विवेकानंद, बाबासाहेब पुरंदरे, मधू दंडवते, शिवाजी सावंत, मनोहर पर्रीकर ही अशी व्यक्तिमत्व ही पुस्तकात न मावणारी असतात. त्यांचा सहवास लाभला, त्यांची भाषण ऐकली, त्यांनी केलेला जो जीवनप्रवास पाहीला त्यांच्या व्यक्तिमत्वातील पैलू, त्यांची विदवत्ता, बुद्धीचातुर्य, व्यासंगानी आपल्या अंतर्मनात अढळ स्थान निर्माण करतात. ही आपल्याकरीता प्रेरणा देणारी असतात, असे प्रतिपादन जडणघडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे यांनी केले.

ज्ञानसंपदा स्कूल आयोजित ज्ञानसंपदा व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. सागर देशपांडे यांनी पुस्तकात न मावणारी माणसं या विषयावर गुंफले. मानद सचिव अरूण कुलकर्णी, विश्वस्त श्रीहरी टिपूगुडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. हे व्याख्यानमालेचे १५ वर्ष आहे.

देशपांडे म्हणाले की १२ व्या शतकात संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदान लिहिले, ते संपूर्ण प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी इतका दूरदृष्टी व संवेदनशील विचार माऊलीनी मांडला. जगातील शुन्याचा शोध भारतातील शास्त्रज्ञांनी लावला. छत्रपती शिवाजी महाराजांचे आयुष्य फक्त ५० वर्ष होते शिवाजी महाराजांनी रयतेच्या मनातील गुलामगिरीची भिती दूर केली राज्यव्यवहार भाषेचा कोशाची निर्मिती करून महाराजांनी मराठी भाषेची अस्मिता जोपासण्याचे उदात्त कार्य केले.

आचार्य अत्रे ही महाराष्टाची ओळख त्यांनी विनोदाला मराठी साहित्यात नवी झालर लावत दिलखुलास अशी ओळख निर्माण केली. अत्रेचा विनोद हा घायाळ करणार तर पु. ल. देशपांडेचा विनोद हा मलमपटटी करणार होता. अत्रे हे मराठी साहित्यातील थोर रत्न त्यांच्या व्यक्तिमत्वातील असंख्य पैलू, त्यांचे निखळ व मिस्किल विनोद, प्रतिभा, व्यासंग, हाजरजबाबीपणा देशपांडेनी उलगडून दाखवले,

इतिहास जिवंत करणारे व प्रगल्भ लेखन करणारे मृत्युंजकार शिवाजी सावंत यांचे लेखन अंतमुख करणारे आहे. मृत्यजंय ही कांदबरी आत्महत्या करायला गेलेल्या व देशाच्या जवानाना प्रेरणा देणारे पुस्तक आजही त्या पुस्तकांच्या हजारो आवृत्या सगळया आठ भाषेत अनुवादीत झाल्या आहेत १९९० साली मृत्यजंयची राइटर्स वर्कशॉपच्या वतीने साहीत्यातील नोबेल पुरस्कारा करीता शिफारस होणारी कांदबरी आहे. एफवाय पर्यत शिक्षण घेतलेला शॉटहॅडचा शिक्षक मृत्यजंयसारखी कर्णावरची कांदबरी लिहितो. की जे महाभारतातील उपेक्षित पात्र आहे.

डॉ. देशपांडे यांनी यावेळी खंत व्यक्त केली माणूस जिवंत असताना त्यांचे महत्व समजत नाही परंतू निधनानंतर दोन दोन तीन पाने छापून येतात ती हयात असताना लिहावे.

स्वामी विवेकानंद यांचे भारतभ्रमन व ज्ञानाची उपासना अगभरात पसरवणारे देशभक्त आपल्या अंतर्मनात अढळ स्थान निर्माण करतात. शिवचरित्रकार बाबासाहेब पुरंदरे यांनी साडेबारा हजार शिवचरीत्रावर व्याख्यान, जाणता राजा या महानाटयाचे एक हजार पेक्षा जास्त मराठी व इंग्रजीत प्रयोग झालेत यातून जमा झालेल्या उत्पन्नातून समाजातील वेगवेगळया उपेक्षित घटकांना देणग्या, मदत आणि एकमेव वक्ता की वयाच्या ८० वषापर्यत शिवचरीत्रावर व्याख्यान देतो बाबासाहेब पुरंदरे हे वेळेला अतिशय महत्व देत.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांनी केले. सुत्रसंचालन सौ. मुक्ता दिवेकर यांनी केले. पाहुण्याचा परीचय श्रीमती शिल्पा कुलकर्णी यांनी करून दिला. कैलास जाधव यांनी आभार मानले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलींद गंधे, मानद सचिव अरूण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, विश्वस्त श्रीहरी टिपुगुडे, सुमित सोनवणे, शिल्पकार प्रमोद कांबळे आदी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## शास्त्र आणि शस्त्र

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

ज्ञानेश्वर माउली भगवद्गीतेला गीताशास्त्र म्हणून गौरवितात. ती ब्रह्मविद्या आहे. ती सकल विद्यांच्या शिखरस्थानी आहे.

तैसी ब्रह्मविद्या रावो ।
सकल शास्त्रांचा विसंवता ठावो।

सगळी शास्त्रे गीतेच्या ठायी विश्रांतीला येतात. तिथेच ती विसावतात. गीता हे नीतीशास्त्र आहे. शास्त्र हे माणसाला दिशा देते. नियम आणि नियमन शिकविते. नैतिकता जागवते आणि नैतिकतेला उभे करते.

शास्त्र हे अनुभवाने सिद्ध झालेले असते. आध्यात्मशास्त्र, हे संगीतशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या संकल्पना नीतीशास्त्राच्या अंगाने समाजमनात रुजल्या आहेत. प्रत्येक शास्त्राची, वास्तवाच्या भौतिकतेला स्वीकारून नैतिकतेने घडविलेली एक स्वतंत्र मांडणी आहे. प्रत्येक शास्त्राची स्वतंत्र फलश्रुती आहे. स्वतंत्र प्रयोजन आहे. प्रत्येक शास्त्र हे एकीकडे भौतिक तर दुसरीकडे नैतिक किंवा आध्यात्मिक अंगाने मानवी कल्याणासाठी उभे ठाकले आहे.

मानवतेचा विचार घेऊन समाजमनाला बांधण्यासाठी ही शास्त्रे उभी राहिली. सारी शास्त्रे परस्परपूरक आहेत. आध्यात्मशास्त्राला नीतीशास्त्राची जोड नसेल तर अध्यात्म केवळ तत्त्वदर्शी राहील. नीतीशास्त्राने जोडलेले अध्यात्म हे जीवनदर्शन ठरेल, अर्थशास्त्र म्हणेल की माझा नीतीशास्त्राशी काय संबंध?

जीवनाच्या हितासाठी अर्थप्राप्ती व्हायला हवी. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली म्हणतात...

म्हणौति स्वधर्मे जे
जे अर्जे।
ते स्वधर्मेचि विनियोगिजे ।

स्वधर्माने अर्थप्राप्ती करा आणि स्वधर्मानेच तिचा विनियोग करा हे सांगणारे अर्थशास्त्रही नीतीशास्त्राच्याच मार्गाने जाते. राज्यशास्त्र, समाजशास्त्र तर सामूहिक जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणारी जीवनदर्शी संहिताच आहे. मानवी जीवन, त्याचा देह, इंद्रिये, भोग, मानवी मन, त्याच्या गरजा, भाव–भावना, या साऱ्यांचा सारासार विचार करून सामुहिक जीवन जगणारी मूल्य देण्यासाठी शास्त्रे उभी आहेत.

शास्त्राच्या आधारे वर्तन करणे हे मानवी जीवनातील सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. मोठी माणसे नेहमीच शास्त्राधारे वर्तन करतात. त्यांच्यासाठी शस्त्राचा उपयोग करावा लागत नाही पण नीतीनियमाना तुडवून, स्वार्थासाठी, भोगासाठी, इतरांना त्रास देण्यासाठी जेव्हा माणसे अविचारी कृत्ये करतात तेव्हा त्यांच्यासाठी शस्त्राचा उपयोग करावा लागतो.

दुर्बलांना मारण्यासाठी शस्त्र नाही तर शास्त्राचे रक्षण करण्यासाठी शस्त्र हवे. शास्त्राशिवाय म्हणजेच नैतिकतेशिवाय होणारा शस्त्राचा उपयोग हाच अतिरेक होय. शस्त्रालाही शास्त्राचे बंधन आहे.

**– किशोर गांधी**

# राष्ट्रध्वजाचा सन्मान करा

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन, खराब झालेले ध्वज तहसील कार्यालयात जमा करा

नगर – प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिनासारख्या राष्ट्रीय सणांना आपण मोठ्या अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवतो. मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर अनेकदा हेच ध्वज रस्त्यावर किंवा कचऱ्यात पडलेले दिसतात. हा आपल्या राष्ट्रध्वजाचा अपमान आहे. हा अवमान टाळण्यासाठी नागरिकांनी दक्ष राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

ध्वजसंहितेच्या नियमांचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. कागदी ध्वजांचा वापर करताना काळजी घ्यावी. जर तुमच्याकडे खराब झालेले किंवा माती लागलेले ध्वज असतील, तर ते इकडे–तिकडे न फेकता एका कापडात किंवा गोणीत व्यवस्थित बांधून ठेवावेत. त्यानंतर हे ध्वज आपल्या जवळच्या तहसील कार्यालयात नेऊन जमा करावेत. राष्ट्रध्वजाचे पावित्र्य आणि सन्मान राखण्यासाठी नागरिकांनी, संस्थांनी आणि संघटनांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# संवेदनशीलता व जनजागृती या विषयावर डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत व्याख्यान



डॉक्टर विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात संवेदनशीलता व जनजागृती व्याख्यानाचे उद्घाटन दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी अ‍ॅड.तनुजसिंह ठाकूर, प्राचार्य आर. आर.नवथर, प्राध्यापक, विद्यार्थी. (छाया – विजय मते)

नगर – अहिल्यानगर मधील विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात संवेदनशीलता व जनजागृती या विषयावर व्याख्यान देण्यात आले. या कार्यक्रमासाठी जिल्हा सत्र न्यायालयाचे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता अ‍ॅड.तनुजसिंह युवराजसिंग ठाकूर यांनी प्रतिबंध कायद्यातील विविध तरतुदी, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाची गरज, तसेच अंतर्गत तक्रार समितीची रचना, कार्यपद्धती व तक्रारनिवारण प्रक्रियेबाबत अभ्यासपूर्ण प्रभावी मार्गदर्शन केले.

महिला कर्मचारी व विद्यार्थीनींनी कामाच्या ठिकाणी आपली सुरक्षितता म्हणून संबंधितांशी वागताना कुठल्या गोष्टीचा स्विकार करावा व कुठल्या गोष्टीला प्रतिकार करावा याचा विचार करुन निर्णय घेणे हे स्वतःवरच अवलंबून आहे. हा मुद्दा स्पष्ट करताना त्यांनी रोडवरील सिग्नलचे उदाहरण देवून समजावले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांना झाला. कार्यक्रमासाठी तांत्रिक संचालक प्रा.सुनील कल्हापूरे यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.आर. आर.नवथर यांनी कार्यक्रमाचे महत्व अधोरेखित करत कायद्याबाबत जागरूकता निर्माण होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

डॉ.एस.एस.मगर यांनी प्रास्तविक केले.

प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस.ए.मरकड, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी विवेक पाटेकर यांनी आभार मानले. अशा प्रकारच्या जनजागृतीपर उपक्रमांमुळे महाविद्यालयीन परिसरात सुरक्षित, सन्मानजनक व संवेदनशील वातावरण निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल. असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

फाउंडेशनचे सचिव डॉ.पी.एम. गायकवाड यांनी आयोजकांचे अभिनंदन करून कार्यक्रम ासाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे चेअरमन पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील यांनी कौतुक केले.

# ३५ गावांना वरदान ठरणाऱ्या 'साकळाई' चे काम लवकरच सुरू होणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार शुभारंभ



वाळकी (ता.नगर) येथे पालकमंत्री विखे पाटील यांचे स्वागत करताना भाजपाचे पदाधिकारी.

नगर – राज्यात भाजपा महायुतीचे सरकार चांगले काम करत आहे. राज्यातील लोकोपयोगी विकास कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्य दिले आहे. नगर – श्रीगोंदा तालुक्यातील ३५ गावांना वरदान ठरणारी 'साकळाई' योजना पुर्ण करणार असून आगामी काही दिवसातच योजनेच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करणार असल्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना स्पष्ट केले. जिल्हा परिषदेच्या वाळकी गटात गेल्या पंधरा वर्षात रखडलेली विकास कामे मार्गी लावायची असतील तर वाळकी गटातील जनतेनी लोकसभा निवडणुकीत केलेली चुक पुन्हा करू नका. वाळकी गटात भाजपा महायुतीचा झेंडा फडकवा असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा नियोजित जामखेड दौरा असताना त्यांनी वाळकी (ता. नगर) येथे भेट दिली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमात वाळकी गटातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, जेष्ट नेते विनायक देशमुख, बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, पंचायत समितीचे माजी उपसभापती रंगनाथ निमसे, बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे, रेवणनाथ चोभे, संतोष म्हस्के, तालुकाध्यक्ष दिपक कार्ले, राम पानमळकर, दादासाहेब दरेकर, सरपंच शरद बोठे, धर्मराज शैक्षणिक संस्थेचे सचिव विक्रम कासार, संजय गिरवले, रमेश भांबरे, प्रशांत गहिले, यासीनभाई शेख, प्रभाकर बोरकर, दादाभाऊ चितळकर, भाऊसाहेब लांडगे, बाजीराव हजारे, अशोक कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य ओंकार निमसे, विकास कासार, राम कासार, महादेव कासार, प्रथमेश भालसिंग, गणेश धोंडे, भाऊसाहेब भालसिंग, संदीप बोठे, अक्षय भालसिंग, दादासाहेब बोठे, गणेश भालसिंग, संदीप जाधव, विक्रम भालसिंग, शिवाजी लोखंडे, बाळासाहेब जाधव, आदिंसह वाळकी गटातील कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी ना. विखे पाटील म्हणाले की, आगामी होणाऱ्या जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणूकीत भाजपा महायुतीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे. लोकसभेला झालेल्या चुकांची पुनरावृत्ती पुन्हा होऊ देऊ नका. 'साकळाई' योजना मार्गी लागणारच आहे. वाळकी गटात परिवर्तन होणे गरजेचे असून गटातील जनतेने भाजपाच्या पाठीमागे उभे रहावे. विकास कामे मार्गी लावण्याची जबाबदारी असेल असे ना. विखे यांनी सांगितले.

नगर–श्रीगोंदा मतदार संघातील ३५ गावांचा पाणीप्रश्न सोडवून हजारो हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी साकळाई योजना महत्वाची आहे. ही योजना मार्गी लावण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे . येत्या काही दिवसातच या योजनेच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

# चेकचा अनादरप्रकरणी आरोपीस कारावास आणि दंडाची शिक्षा

नगर – येथील ११ वे अतिरक्त चिफ ज्युडिशिल मॅजिस्ट्रेट यांनी शशीकांत मायंबा धाडगे, रा. दत्तवाडी, कापुरवाडी ता. जि. अहमदनगर यांस निगोशिएबल इन्स्ट्रूमेट अ‍ॅक्ट कलम १३८ अंतर्गत दोन महिने साधा कारावास व तसेच त्यांना रु. २,४८,७५९ आरोपीस दंड केला आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम न भरल्यास तीन म हिन्याच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत भिस्तबाग अहमदनगर येथून शशीकांत मायंबा धाडगे यांनी रक्कम रु.२,००,००० दिनांक १२/०४/२०२३ रोजी कर्ज घेतलेले होते व तसेच कर्जाचा हप्ता नियमितपणे भरणा करणार असा विश्वास दिला होता परंतू त्यांनी कर्जाच्या हप्त्याची रक्कम थकवली होती. सदर थकीत रक्कमेपोटी आरोपी यांनी रक्कम रुपये रु.२,०५,५८६ चा चेक दिनांक ३१/०८/२०२३ रोजीचा फिर्यादी पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादीत भिस्तबाग अहमदनगर यांना दिला होता. त्यानंतर फिर्यादी संस्थेने सदरचा चेक हा त्यांचे खाते असलेल्या अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल को ऑप बँक लि. शाखा सावेडी रोड, अहमदनगर येथे चेक हा वटण्यासाठी भरला असता खात्यात पुरेशी शिल्लक रक्कम नसल्याने चेक न वटता परत आला होता. त्यामुळे फिर्यादी संस्थेने शशीकांत मायंबा धाडगे रा. दत्तवाडी, कापुरवाडी ता., जि. अहमदनगर यांचे विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेट अ‍ॅक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेचा पुरावा ग्राहय धरून आरोपीस शिक्षा ठोठवली आहे. सदर केसमध्ये फिर्यादी संस्थेच्या वतीने माहितगार इसम म्हणुन सौ. चंद्रकला मधुकर भांड व गणेश हिरालाल दायमा यांनी काम पाहिले.

फिर्यादी संस्थेतर्फे अ‍ॅड. नवनाथ किसन नरसाळे यांनी सक्षमपणे बाजु मांडली. या निर्णयामुळे आर्थिक संस्थांना संरक्षण मिळेल. तसेच चेक बाऊंस प्रकरणी कायद्याचा धाक अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे व अशा प्रकारच्या फसवणुकीस आळा बसण्यास मदत होईल.

# बाल वैज्ञानिक प्रदर्शन विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, संशोधन वृत्तीला दिशा देणारे व्यासपीठ

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन, जिल्हास्तरीय ५३ वे बाल वैज्ञानिक प्रदर्शन पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



जामखेड येथील नागेश विद्यालय येथे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग व जिल्हा विज्ञान–गणित अध्यापक संघ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५–२६ चे पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे.

नगर – बाल वैज्ञानिक प्रदर्शन हे विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता व संशोधन वृत्तीला दिशा देणारे प्रभावी व्यासपीठ आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा शास्त्रज्ञ, संशोधक, अभियंता व राष्ट्रनिर्माता आहे. त्यामुळे देशपातळीवर होत असलेल्या नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना देणे आवश्यक असून, त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

जामखेड येथील नागेश विद्यालय येथे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग व जिल्हा विज्ञान–गणित अध्यापक संघ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५–२६ चा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, नागेश विद्यालयाचे प्राचार्य भगवान मडके उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांनी प्रयोग, संशोधन व निरीक्षणावर भर दिला पाहिजे. आज जगभरात भारतीय शास्त्रज्ञ आपली क्षमता सिद्ध करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून आत्मनिर्भर भारताकडे देशाची वाटचाल सुरू आहे. देशात तसेच जगभरात तंत्रज्ञानात होत असलेले बदल व नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी इस्त्रो, नासा यांसारख्या वैज्ञानिक संस्थांना विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करण्यात यावे.

ते पुढे म्हणाले, संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आजच्या घडीला प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होताना दिसत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विविध क्षेत्रांमध्ये वेगाने वाढत आहे. देश कौशल्य विकास कार्यक्रमात उभारी घेत असून, उद्योगांच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहेत. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून कौशल्याधारित कोर्सेस सुरू करण्यात यावेत. कालानुरूप शैक्षणिक अभ्यासक्रमातील बदलते प्रवाह यासारख्या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

आजच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात अशा जिल्हास्तरीय प्रदर्शनांमधून भावी गुणवंत वैज्ञानिक घडावेत, यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. प्रदर्शन आयोजनासाठी असलेल्या ५ लाख रुपयांच्या निधीत वाढ करून तो १ कोटी रुपयांपर्यंत करण्यात येईल. या माध्यमातून जिल्ह्यातून भविष्यात मोठे शास्त्रज्ञ व संशोधक घडतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड म्हणाल्या की, विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयांबाबत आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून प्रत्येक तालुक्यात बाल वैज्ञानिक प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामधून उत्कृष्ट ठरलेली उपकरणे जिल्हास्तरीय प्रदर्शनात सादर करण्यात आली आहेत. मूल्यांकनानंतर उत्कृष्ट ठरलेल्या २९ उपकरणांचा राज्यस्तरीय प्रदर्शनात समावेश करण्यात येणार आहे.

या बाल वैज्ञानिक प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शाळांमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, पर्यावरण, आरोग्य, शेती, ऊर्जा, पाणी व्यवस्थापन, डिजिटल तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या विषयांवर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विध्यार्थ्यांच्या या प्रकल्पाची पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी करून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, संशोधन वृत्तीचे व सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणाऱ्या या प्रकल्पांचे कौतुक केले. कार्यक्रमात विविध गटांतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, सन्मानचिन्हे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा विज्ञान–गणित अध्यापक संघाचे पदाधिकारी, अधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

# ‘मनपाचा मतदार राजा’ काव्य स्पर्धेचे स्वीप समितीच्या वतीने आयोजन

## स्पर्धकांनी स्वतःच्या मातृभाषेत कविता पाठवण्याचे प्रशासनाचे आवाहन

नगर – राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून १०० टक्के मतदान करावे, तसेच मतदानाची टक्केवारी वाढावी व जनजागृती व्हावी, यासाठी मनपा स्वीप समितीच्या वतीने मनपाचा मतदार राजा या काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




आपल्या शहरात व परिसरात विविध भाषा बोलणारे नागरिक गुण्यागोविंदाने राहतात. लोकशाहीमध्ये ’भाषा’ ही माणसांना जोडण्याचे महत्त्वाचे काम करते. नागरिक आपल्या भावना मातृभाषेतून अधिक प्रभावीपणे व्यक्त करू शकतात. त्यामुळेच, मनपा स्वीप समितीने विविध भाषांमधील कवी आणि गीतकारांना मनपाचा मतदार राजा या विषयावर व्यक्त होण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असल्याची माहिती निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

**स्पर्धेचे स्वरूप व नियम :** स्पर्धकांनी स्वरचित कविता सादर करणे अनिवार्य आहे. सादरीकरणासाठी काव्यलेखन, काव्यगायन किंवा काव्यवाचन यांपैकी एक माध्यम निवडता येईल. कवितेत कोणत्याही राजकीय घटकाचा उल्लेख नसावा. स्पर्धकांनी आपल्या कविता १६ जानेवारी पर्यंत पाठवणे अपेक्षित आहे.

**कवितेसाठी सुचवलेले विषय /संदेश :** १) अहिल्यानगरकरांनो, तुम्ही लोकशाहीची पणती हाती धरा, मनपाच्या निवडणुकीत जरूर मतदान करा., २) आपले मतदान १५ जानेवारी रोजी आहे, कृपया विसरू नका., ३) अहिल्यानगरीच्या मतदार राजा जागा हो – १५ जानेवारी रोजी लोकशाहीचा धागा हो.

**सहभागासाठी संपर्क :** इच्छुक स्पर्धकांनी आपल्या कविता देशातील पहिल्या ’मनपा स्वीप केअर’ उपक्रमाच्या ८०५५८०९३९४ या व्हॉट्सप क्रमांकावर आपल्या संपूर्ण नाव व पत्त्यासह पाठवाव्यात. तसेच, या कविता स्वतःच्या सोशल मीडिया हँडलवर देखील शेअर कराव्यात.

मतदार जनजागृतीचा उत्कृष्ट संदेश देणाऱ्या कवितांना पारितोषिके देण्यात येणार असून, सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येईल. कवी, लेखक आणि साहित्यिकांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी तथा उपायुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा व मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, मतदारदूत डॉ. अमोल बागुल आणि प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे यांनी केले आहे.

# पॅरालिम्पिकमध्ये पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला दीपा मलिक यांना ध्यानधारणेची पुस्तके देण्यात आली भेट



पॅरालिंपिकमध्ये पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला दीपा मलिक यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट देण्यात आली.

नगर – पद्मश्री, अर्जुन पुरस्कार, राजीव गांधी खेल रत्न पुरस्काराने सन्मानित तसेच २०१६ च्या रिओ पॅरालिंपिकमध्ये शॉटपुटमध्ये रौप्य पदक जिंकून पॅरालिंपिकमध्ये पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरलेल्या भारतीय पॅरालिंपिक ॲथलीट दीपा मलिक यांना त्यांच्या अहिल्यानगर येथील निवासस्थानी जगभरातील १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या सहसंचालीका ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी यांनी त्यांची भेट घेऊन संस्थेच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व त्यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली.

यावेळी बी के मुन्ना दीदी व १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके उपस्थित होते.



स्टॅमिना स्पोर्टस् ॲकॅडमीच्या विजेत्या खेळाडूंसमवेत प्रशिक्षक वसिम शेख.

# स्टॅमिना स्पोर्टस् ॲकॅडमीचे यश

नगर – नुकत्याच भिंगार येथे पार पडलेल्या तायक्वांदो स्पर्धेमध्ये शहरातील स्टॅमिना स्पोर्टस् अकॅडमीच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण, ५ रजत, २ कांस्य पदक अशी एकूण ११ पदके पटकावून वर्चस्व गाजवले आहे.

यामध्ये कु. इनाया शहबाज शेख (सुवर्ण), हसनैन अन्वर शेख (सुवर्ण), शादाब नादीर शेख (सुवर्ण), अलि नादीर शेख (सुवर्ण), उम्मे कुलसुम वसीम शेख (रजत), काजी निया परवेज (रजत), अली शहबाज शेख (रजत), कु. काजी नायरा (रजत), अदनान अरिफ सय्यद (रजत), खान उवेज इरफान (कांस्य पदक), मो. रजीन वसीम शेख (कांस्य) अशा विजेत्या खेळाडूंचा समावेश आहे. हे सर्व खेळाडू स्टॅमिना स्पोर्टस् अकॅडमीच्या हातमपुरा, गुलमोहोर रोड, बारा बाभळी पाथर्डी रोड अशा शाखांमध्ये सरावासाठी मेहनत घेतात.

या सर्व विजयी खेळाडूंना अकॅडमीचे अध्यक्ष व प्रशिक्षक, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते वसीम हाजी इसहाक शेख यांचे मार्गदर्शन लाभत आहे. यावेळी सचिन कोतकर यांनी शेख वसीम यांचा स्मृतीचिन्ह देवून सन्मान केला.

सर्वांनी आपल्या पाल्यांना शरीर निरोगी ठेवण्यासाठी मोबाईलच्या विळख्यातून बाहेर काढून व्यायामाकडे वळवावे असे आवाहन वसीम शेख यांनी केले. ॲडमीशनसाठी (मो. ८३२९१९१८५९ / ९८५०३२७८६५) यांच्याशी संपर्क साधावा.

# मधुमेहापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी योग्य जीवनशैलीच्या नियमांचे पालन करावे

## डॉ. कृष्णा बलदवा यांचे प्रतिपादन, रोटरी क्लब मिडटाउनच्या मधुमेह तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर – सध्याच्या ताणताणाव युक्त जीवनशैली व हायब्रीड, फास्टफूडच्या सेवनाने मोठ्या वेगाने मधुमेह आजार वाढत आहे. या आजाराबद्दल जनजागृती होत आहे पण नागरिकांचे याकडे दुर्लक्ष असल्याने या आजाराच्या विळख्यात नागरिक अडकत आहेत. मधुमेहापासून बचावासाठी नागरिकांनी योग्य जीवनशैलीच्या नियमांचे पालन करावे. रोटरी मिडटाउन क्लबने नागरिकांसाठी मोफत मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन करून चांगला उपक्रम राबवला आहे, असे प्रतिपादन मधुमेह तज्ज्ञ डॉ. कृष्णा बलदवा यांनी केले.



रोटरी क्लब मिडटाउन आयोजित मोफत मधुमेह तपासणी शिबिराचे उद्घटन करताना मधुमेह तज्ज्ञ डॉ. कृष्णा बलदवा. समवेत रोटरी क्लब मिडटाउनचे अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, सचिव महेश गोपाळकृष्णन, डॉ.प्रसाद उबाळे, अलका बलदवा व सारा बलदवा.

रोटरी क्लब मिडटाउनच्या वतीने बलदवा हॉस्पिटल येथे आयोजित मोफत मधुमेह तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. कृष्णा बलदवा बोलत होते. यावेळी रोटरी क्लब मिडटाउनचे अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, सचिव महेश गोपाळकृष्णन, डॉ. प्रसाद उबाळे, मार्लिन एलिशा, मधुर बगायत, अलका बलदवा व सारा बलदवा यांच्यासह रुग्ण उपस्थित होते.

प्रास्तविकामध्ये डॉ. विनोद मोरे म्हणाले, रोटरी क्लब विविध क्षेत्रासह आरोग्य क्षेत्रातही प्राधान्याने काम करत आहे. गरजू नागरिकांना या उपक्रमांचा मोठा लाभ होत आहे. मधुमेह तपासणी शिबिरासाठी मधुमेह तज्ज्ञ डॉ. कृष्णा बलदवा यांनी सहकार्य केले आहे.

रजिस्ट्री सं.डी.एल.-३३००४/९९ REGD No.D.L-33004/99

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

सी.जी.एम.एच-अ-२७१२२०२५-२६८८५५ CG-MH-E-27122025-268855

असाधारण EXTRAORDINARY
भाग II-खण्ड ३-उप-खण्ड (ii) PART II-section 3-Sub section (ii)
प्राधिकार से प्रकाशित PUBLISHED BY AUTHORITY

सं.५८१७ नई दिल्ली, शुक्रवार,दिसम्बर २६,२०२५,/पौष ५,१९४७
No.5817 NEW DELHI, FRIDAY, DECEMBER 26,2025/PAUSHA 5, 1947

**रेल मंत्रालय (मध्य रेलवे)**
**अधिसूचना**
**मुंबई, २३ दिसम्बर, २०२५**

रेलवे (संशोधन) अधिनियम २००८ की धारा २०A के तहत

का.आ. ६०१६(अ).-केन्द्रीय सरकारने रेल अधिनियम,१९८९ (१९८९ का २४) एवं रेलवे (संशोधन) अधिनियम २००८ (२००८ का ११) (जिसे इसमे इसके पश्चात उक्त अधिनियम कहा गया है) की धारा २०’ए’ के खंड (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात की लोक प्रयोजन के लिए वह भूमि, जिसका संक्षिप्त विवरण इससे उपावद्ध अनुसूची मे दिया गया है, महाराष्ट्र राज्य के अहमदनगर जिले में ‘दौंड - मनमाड दोहरीकरण’ की विशेष रेल परियोजना के निष्पादन, अनुरक्षण, प्रबंधन और प्रचालन के लिए अपेक्षित है, ऐसी भूमि का अर्जन करने के आशय की घोषणा करती है। ।

उक्त भूमि में द्रितवद्ध कोई व्यक्ति, राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से तीस दिन के भीतर, उक्त अधिनियम कि धारा २० घ कि उप-धारा (१) के अधीन उपर्युक्त प्रयोजन के लिए एसी भूमि के अर्जन और उपयोग के संबंध मे आक्षेप कर सकेगा ।

प्रत्येक ऐसा अप, सक्षम प्राधिकारी अर्थात उप-मंडल अधिकारी, श्रीरामपुर मंडल, श्रीरामपूर जिला, अहमदनगर महाराष्ट्र को लिखित में किया जाएगा और उसके आधार उपवर्णित करेगा और सक्षम प्राधिकारी आक्षेपकर्ता को व्यक्तिगत रूप से या विधि व्यवसायी के माध्यम से सुनवाई का अवसर प्रदान करेगा और ऐसे आक्षेपों की सुनवाई करने तथा ऐसी जांच करने के पश्चात यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे,आदेश द्वारा, या तो आक्षेपों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा ।

उक्त अधिनियम की धारा २० घ की उप-धारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई आदेश अंतिम होगा ।

इस अधिसूचना के अधीन आने वाली भूमि का रेखांकन और भूमि के अन्य ब्यौरे उपलब्ध है और हितबद्ध व्यक्ति द्वारा सक्षम प्राधिकारी के उपर्युक्त कार्यालय मे उनका निरीक्षण किया जा सकता है ।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के अहमदनगर जिले मे विशेष रेल परियोजना ‘‘दौंड - मनमाड दोहरीकरण’’ के लिए अर्जित की जाने वाली भूमि का संरचना या उसके रहित संक्षिप्त विवरण :

| अ.क्र. | भूमी अधिग्रहण प्रस्ताव क्रमांक | गाँव का नाम | तालुका व जिला | ७/१२ अनुसार भूधारक का नाम | सर्वेक्षण संख्या (गट नं.) | भूमि धारण प्रणाली | ७/१२ अनुसार कूल क्षेत्रफल (हे.आर) | संपादनक्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०१/२०२३ | तांदूळवाडी | राहुरी | लक्ष्मण रेवजी वर्पे / आबाजी रेवजी वर्पे | १३३ पै | १ | १६४ | ०.५८ |
| २ | ०१/२०२३ | तांदूळवाडी | राहुरी | अशोक देवराम भालेराव / जनाबाई अशोक भालेराव / आबाजी रेवजी वर्पे | १३४ पै | १ | ०९२ | ०.६८ |
| ३ | ०१/२०२३ | तांदूळवाडी | राहुरी | रंभाबाई केरू तारडे / ज्ञानदेव केरू तारडे / चांगदेव केरू तारडे / नामदेव केरू तारडे / कमल प्रभाकर पोटे | १३५ पै | १ | ००५ | ००५ |
| | | | | | | कूल | २.६१ (हे.आर.) | १.३१ (हे.आर.) |

जिमाका/नगर/जाहि/२३३/२०२६ फा.सं.G197/DD-MMR Doubling Project/Tandulwadi VIg/20A)
अहिल्यानगर,दि.१२/०१/२०२६ अवनीश कुमार पाण्डेय, मुख्य प्रशासनिक अधिकारी (निर्माण)

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु, कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१२/०१/२०२६.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे सावेडी** येथील खालील वर्णनाची मिळकत **- सर्व्हे नं.९९/१+९०/१ अ १ मधील प्लॉट नं.सी १९/एच२/एच३/एच ४ चे एकूण क्षेत्र ९५५.९२ चौ.मी. यावर बांधलेल्या इमारतीचे नांव - ’’समर्थ अपार्टमेंट फेज-१’’ यापैकी सेकंड फ्लोअरमधील फ्लॅट नं.एसएफ-११८ चे एकूण बिल्टअप क्षेत्र ५६.२० चौ.मी. यांसी चतुःसीमा**

पूर्वेस :- ओपन टू स्काय दक्षिणेस :- ओपन टू स्काय
पश्चिमेस :- फ्लॅट नं.एसएफ-११७ व जीना उत्तरेस :- ओपन टु स्काय

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक -**
**सय्यद नासीर सय्यद हसन**
रा. आत्मज, घर नं.१२७,
ननुस मस्जिद मागे, सतारी,
वालपोई, नॉर्थ गोवा, गोवा-४०३५०६.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :- ऑफीस नं.५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर
मो. नं. 9011678999, 9860805559

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कुंडलिक सोन्याबापू कडूस व सौ. सुगंधा कुंडलिक कडूस, दोघेही रा. सारोळा कासार ता. जि. अहिल्यानगर यांच्या मालकी वहिवाटीची मिळकत असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विक्रीबाबत बोलणी होऊन मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांकडून विसारादाखल रक्कम स्वीकारुन सदर मिळकत आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबूल करुन सदर मिळकतीचे साठेखत आमचे अशिलांचे लाभात लिहून दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यालयात नोंदवून दिले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा दस्त लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी, व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही बोजा, मालकी हक्क हितसबंध अगर कब्जा नाही अशी मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरोसा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क, कुळ वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **५ दिवसांचे** आत लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जि. तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी, ता. नगर पैकी अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील **मौजे सारोळा कासार** येथील खालील वर्णनाची जिरायत **शेतजमीन मिळकत** -

| गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ३६० | १० हे ८७ आर | १२ रु. ७५ पैसे |
| | +पो.ख. ०० हे ४२ आर | |
| | ११ हे २९ आर | |

यापैकी विद्यमान मालक कुंडलिक सोन्याबापू कडूस यांच्या मालकीचे १ हे ८१ आर + खराबा ० हे ०७ आर क्षेत्र व विद्यमान मालक सौ. सुगंधा पुंडलिक कडुस यांच्या मालकीचे १ हे ८१ आर+ खराबा ० हे ०७ आर क्षेत्र असे एकूण ३ हे ६२ आर + खराबा ० हे १४ आर क्षेत्र.

**सदर क्षेत्राच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे** -
पुर्वेस :- गट नं. ३६१ व ३६६ दक्षिणेस :- गट नं. ३६७ व ३६६
पश्चिमेस :- सदर गट नं. ३६० पैकी मिराबाई तुकाराम कडुस व इतर यांचे क्षेत्र
उत्तरेस :- सदर गट नं. ३६० पैकी सुमन एकनाथ कडूस यांचे क्षेत्र व त्यातून जाणे येणेचा वहिवाटाचा रस्ता व गट नं. ३६७

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक शेतजमीन मिळकत त्यामधील विहिरीचे पाणी घेण्याच्या हक्कांसह तसेच सदर जमीनीमधील तदंगभूत वस्तुंसह, वागवहिवाटीचे हक्कांसह काही एक राखून न ठेविता.

अहमदनगर
ता. १२/०१/२०२६

**ॲड. फिरोदिया आनंद आर**
ऑफिस - ११९, अंबर प्लाझा ए बिल्डीग
एस.टी. स्टॅण्ड जवळ अहमदनगर, मो : ९८९०६१५२५३



भिंगार येथे सकल मराठा समाजाच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती निमित्त अभिवादन करताना राहुल पानसरे, सौ कांता बोठे, संपत बेरड, रामदास केदार, सुनील ठोके, मच्छिंद्र बेरड, विलास तोडमल, किरण फटांगरे, सचिन जाधव, दीपक लिपाने, अमोल वागस्कर, गणेश शिंदे, योगेश कारंडे, विलास शिंदे, राजेश तनपुरे, ईश्वर गपाट, संभाजी वाबळे, राजेंद्र कडूस, राजकुमार कार्ले, नवनाथ कापसे, भूषण थोरात अध्यक्ष गणेश सातकर, एकनाथ मोरे व समाज बांधव.

# शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत मिरीच्या छत्रपती श्री शिवाजी महाराज हायस्कूलचे यश

नगर – रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती श्री शिवाजी महाराज हायस्कूल, मिरी (तालुका– पाथर्डी) विद्यालयाने शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई आयोजित शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा २०२५ मध्ये यश मिळविणारे विद्यालयातील विद्यार्थी – एलिमेंट्री परीक्षा – (१००% निकाल)– परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थी – ४५, ए श्रेणीमध्ये पात्र विद्यार्थी – २१, बी श्रेणीमध्ये पात्र विद्यार्थी – १४, क श्रेणीमध्ये पात्र विद्यार्थी – १०. इंटरमिजिएट परीक्षा – (१००% निकाल) – परीक्षेत प्रविष्ट विद्यार्थी – २४, ए श्रेणीमध्ये पात्र विद्यार्थी – ५, बी श्रेणीमध्ये पात्र विद्यार्थी – ८, क श्रेणीमध्ये पात्र विद्यार्थी – ११.

यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक नेहुल एस.बी व कदम एस.पी यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक ढोले जी व्हि., पर्यवेक्षक कटके यू जी, स्थानिक स्कूल कमिटी, स्थानिक व्यवस्थापन समिती, स्थानिक सल्लागार समिती, माता पालक संघ, समस्त पंचक्रोशी ग्रामस्थ, पालक, शिक्षक शिक्षकेतर वृंद यांनी अभिनंदन केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.रामदास भाऊसाहेब सोनवणे, रा.मु.पो.हिंगणगांव,ता.व जि. अहिल्यानगर यांचे स्वतंत्र मालकी व वहिवाटीची आहे.सदरील मिळकती या आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देवून ती आमचे अशिलांस खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पूर्ण करण्याचे विचारात आहेत.तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकती निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब ज्या कोणाचेही कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवसांपासून ७ दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यांनीशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटून त्याची खातरजमा करून घ्यावी.व या व्यवहारांस लेखी हरकत घ्यावी.या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पूर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**-परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर,जि.अ.नगर पैकी अ.नगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे कर्जुनेखारे येथील मे.दुय्यम निबंधक साहेब, जि.अ.नगर यांचे कक्षेतील शेतजमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| १) गट नं. | एकुण क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| १७६/१/अ | १ हे.८८ आर | ६ रू.५० पै. |
| | पो.ख.० हे.०१ आर | |
| | एकुण १ हे.८९ आर | |

यापैकी विद्यमान मालकांचे संपूर्ण पुर्व बाजुकडिल क्षेत्र ० हे.९४ आर,वागणुकीचे,वहिवाटीचे, रस्त्याचे हक्कांसह काही एक राखून न ठेविता.

**यांसी चतुःसिमा :-**
पुर्वेस : लागू गट नं.१७६/२
दक्षिणेस :- गट नं,१७६/१/ब/१ मधील विद्यमान मालकांचे ० हे.२५.५० आर क्षेत्र.
पश्चिमेस :- गट नं.१७६/१/अ पैकी उर्वरित क्षेत्र.
उत्तरेस :- लागू गट नं.१८१,१७८,१७९.

| २) गट नं. | एकुण क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| १७६/१/ब/१ | ० हे.५१ आर | १ रू.७५ पै. |

यापैकी विद्यमान मालकांचे संपूर्ण पूर्व बाजूकडिल क्षेत्र ० हे.२५.५० आर,वागणुकीचे,वहिवाटीचे, रस्त्याचे हक्कांसह काही एक राखून न ठेविता.

**यांसी चतुःसिमा :-**
**पुर्वेस :-** लागु गट नं.१७६/२. **दक्षिणेस :-** गट नं.१७६/१/ब/२
**पश्चिमेस :-** गट नं.१७६/१/ब/१ पैकी उर्वरित क्षेत्र.
**उत्तरेस :-** गट नं.१७६/१/अ मधील विद्यमान मालकांचे ० हे.९४ आर. क्षेत्र.

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वकची मिळकत.जाहीर नोटीस दिली.ता.१२.०१.२०२६.

**ॲड.निहालअहमद बाबुलाल बागवान,**
श्रेयस लॉनच्या मागे,सैनिक कॉर्नर,
तपोवन रोड,भिस्तबाग,
अहिल्यानगर
मो.९९२१३५५७७८

**ॲड. विजय प्रल्हाद अत्रे,**
‘पूर्णश्री’, प्लॉट नं.२८,स्वामी
गजानन नगर,कजबे मळा,भिस्तबाग,
अहिल्यानगर.
मो.९८२२०४३९६७.

# शाळांमध्ये जाऊन हायजिन क्लब स्थापन करणार, नवीन वर्षात उपक्रम




नगर – हायजिन फर्स्ट च्या झालेल्या सभेमधून विद्यार्थ्यांमध्ये आणखी जनजागृती वाढण्यासाठी शाळा शाळांमध्ये जाऊन हायजिन क्लब स्थापन करण्यात येणार आहे. त्या क्लबच्या माध्यमातून क्लबचे सदस्य विद्यार्थी घरोघरी जाऊन हायजिन विषयी माहिती सांगणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांचे क्लब स्थापन करून त्यांना बॅचचे वाटप केले जाईल. त्यामध्ये पसरणारे रोगराई स्वच्छतेचे महत्व घ्यावयाची काळजी या विषयांचा समावेश असेल.

सर्व शाळा महाविद्यालयांनी सहकार्य करावे असे आवाहन अध्यक्षा वैशाली गांधी यांनी केले आहे.

# अर्थजगत

## नवीन वर्ष, नवीन मनी प्लॅन!

नवीन वर्ष २०२६ सुरू झाले आहे. कमाई, बचत आणि गुंतवणुकीबाबत प्रत्येकजण नवीन वर्षात काही ना काही संकल्प करत असतो. नवीन गुंतवणूकदार जिथे गुंतवणुकीचे पर्याय शोधत असतील, तिथे जुने गुंतवणूकदार आपल्या पोर्टफोलिओमध्ये बदल किंवा विविधतेचा (डायव्हर्सिफिकेशन) विचार करत असतील. सध्याच्या काळात शेअर बाजार आणि म्युच्युअल फंड हे गुंतवणुकीचे पर्याय वेगाने लोकप्रिय होत आहेत. २०२६ मध्ये गुंतवणूकदारांनी नेमक्या कोणत्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे, ज्यामुळे कमाई, बचत आणि गुंतवणुकीचा समतोल राखला जाईल आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करणे सोपे होईल, हे आपण तज्ज्ञांच्या नजरेतून समजून घेऊया.

**आयुर्विमा आणि आरोग्य विमा**

गुंतवणुकीची सुरुवात करण्यापूर्वी तुमच्याकडे पुरेसा आयुर्विमा आणि आरोग्य विमा आहे की नाही, याची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे. जर नसेल किंवा अपुरा असेल, तर २०२६ मध्ये सर्वात आधी हे दोन कवच नक्की मिळवा. आयुर्विमा तुमच्या कुटुंबाला आणि तुमच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना कोणत्याही अनपेक्षित घटनेच्या वेळी आर्थिक आधार देतो.

त्याचप्रमाणे, पुरेसा आरोग्य विमा असणेही तितकेच गरजेचे आहे. आजच्या काळात उपचारांचा खर्च इतका वाढला आहे की, जर कुटुंबातील कोणालाही रुग्णालयात दाखल करावे लागले, तर तुमची आयुष्यभराची पुंजी केवळ उपचारांचे बिल भरण्यात खर्च होऊ शकते. यामुळे तुमच्या भविष्यातील गुंतवणुकीच्या योजना आणि उद्दिष्टांना मोठा धक्का बसू शकतो.

**'मार्केट सायकल' समजून घ्या**

बाजार कोणत्याही स्थितीत असला तरी गुंतवणूकदाराने संयम राखणे आवश्यक असते. 'मार्केट सायकल'मध्ये चढ-उतार येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. कधी बाजार तेजीत असतो तर कधी मंदीत, पण अशा काळात आपली गुंतवणूक टिकवून ठेवणे सर्वात महत्त्वाचे असते. घाबरून जाऊन गुंतवणूक काढून घेतल्यास नुकसान होण्याची शक्यता वाढते.

जर तुम्ही संयम राखून दीर्घकाळासाठी गुंतवणूकदार म्हणून टिकून राहिलात, तर तुम्हाला बाजाराच्या संपूर्ण चक्राचा फायदा मिळेल. 'एसआयपी' (सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) सारखी नियमित गुंतवणूक बाजाराच्या घसरणीतही सरासरी खरेदी किंमत कमी करण्यास मदत करते. बाजाराचा इतिहास सांगतो की, तो काळानुसार सावरतो आणि नवीन उच्चांक गाठतो. त्यामुळे अल्पकालीन चढ-उतारांमुळे घाबरून जाण्याऐवजी दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करावे.

**'एसआयपी' सुरू करावी की गुंतवणुकीची रक्कम वाढवावी?**

असे म्हटले जाते की, नवीन सुरुवात केल्यानेच नवीन संधी निर्माण होतात. त्यामुळे जर तुम्हाला म्युच्युअल फंडात गुंतवणूक करायची असेल, तर 'एसआयपी'च्या माध्यमातून तुम्ही सुरुवात करू शकता. दुसरीकडे, जे आधीपासून गुंतवणूक करत आहेत, ते आपली 'एसआयपी'ची रक्कम वाढवू शकतात. या दोन्ही गोष्टी २०२६ मध्ये हुशारीचे निर्णय ठरू शकतात.

'एसआयपी'द्वारे नियमित गुंतवणूक केल्याने बाजारातील घसरणीचा फायदा मिळतो आणि गुंतवणुकीची सरासरी किंमत कमी होते. तसेच, ज्या गुंतवणूकदारांचे उत्पन्न स्थिर आहे आणि जे आपल्या उद्दिष्टांबाबत स्पष्ट आहेत, ते आपली गुंतवणुकीची रक्कम वाढवून दीर्घकाळात चांगला परतावा मिळवू शकतात. मात्र, कोणतीही गुंतवणूक करताना आपली जोखीम घेण्याची क्षमता आणि कालावधी लक्षात घेणे आवश्यक आहे.

### आर्थिक उद्दिष्टांचा आढावा घेतला का?

नवीन वर्षात आपल्या आर्थिक उद्दिष्टांची (फायनान्शिअल गोल्स) समीक्षा करणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. बाजारातील चढ-उतार, तुमची जोखीम पत्करण्याची क्षमता (रिस्क प्रोफाईल), उत्पन्न आणि खर्च यामध्ये दरवर्षी बदल होत असतो. अशा स्थितीत, तुम्ही ज्या ठिकाणी पैसे गुंतवले आहेत त्यांची कामगिरी कशी आहे, तुमची जोखीम घेण्याची क्षमता बदलली आहे का आणि तुमची ठरलेली उद्दिष्टे वेळेत पूर्ण होतील का, याचे आकलन करणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे गुंतवणुकीची कामगिरी आणि उत्पन्नाच्या आधारे त्यात आवश्यक बदल करण्याबाबत संशोधन नक्की करा.






**आर्थिक विश्वात काही समजुती अत्यंत घट्ट रुजलेल्या आहेत. अनेक दशकांपासून गुंतवणूकदार यावर डोळे झाकून विश्वास ठेवत आले आहेत. उदाहरणार्थ, शेअर्स नेहमीच सोन्यासारख्या 'अनुत्पादक' मालमत्तेपेक्षा चांगले असतात, संकटकाळात सोने हाच सर्वात सुरक्षित पर्याय आहे आणि विविधीकरणामुळे (डायव्हर्सिफिकेशन) नफा कमी होतो. मात्र, 'डीएसपी म्युच्युअल फंड'च्या ताज्या अहवालाने या सर्व जुन्या संकल्पनांना छेद दिला आहे. गेल्या काही दशकांतील जागतिक आकडेवारीचा आधार घेत हा अहवाल सांगतो की, वास्तव हे आपण समजतो त्यापेक्षा अधिक गुंतागुंतीचे आणि रंजक आहे.**

## गुंतवणुकीतील पारंपरिक संकल्पनांना छेद

**भ्रम १ : शेअर्स सोन्यापेक्षा सरस**

पारंपारिक विचार असा सांगतो की, ज्या मालमत्ता नियमित उत्पन्न देतात (उदा. स्टॉक्स), त्या दीर्घकाळात सोन्यासारख्या उत्पन्न न देणाऱ्या मालमत्तेपेक्षा नेहमीच चांगली कामगिरी करतात. मात्र, डीएसपी म्युच्युअल फंडच्या 'नेत्रा' अहवालातील २१ व्या शतकातील परताव्याचे विश्लेषण वेगळीच कथा सांगते.

सन २००० पासून सोन्याने जगातील सर्व मोठ्या शेअर बाजारांना स्थानिक चलनात मागे टाकले आहे. जपान, ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेसारख्या विकसित बाजारपेठांमध्ये सोन्याने देशांतर्गत शेअर बाजारांच्या तुलनेत अधिक चक्रवाढ परतावा (कंपाउंड रिटर्न) दिला आहे. हाच कल भारतासारख्या उद्योन्मुख बाजारपेठांमध्येही दिसून आला असून, या काळात सोन्याने शेअर्सच्या तुलनेत थोडा अधिक परतावा दिला आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या २० वर्षांत भारतातील 'एनएसई ५००' मधील केवळ २४% शेअर्स सोन्यापेक्षा जास्त परतावा देऊ शकले आहेत. अमेरिकेत तर ही स्थिती अधिक बिकट असून 'एस अँड पी ५००' मधील केवळ ५% शेअर्सनी सोन्याला मागे टाकले आहे. हे आकडे हेच सिद्ध करतात की, केवळ उत्पन्न देणारी मालमत्ता असल्याने शेअर्स आपोआप संपत्ती निर्माण करतात, हा विचार चुकीचा ठरू शकतो.

**भ्रम २: सोने सर्वात सुरक्षित**

दुसरीकडे, अशीही एक धारणा आहे की सोने ही सर्वात सुरक्षित गुंतवणूक आहे आणि अनिश्चित काळात ते नेहमीच शेअर्सपेक्षा चांगली कामगिरी करते. परंतु, रोलिंग रिटर्नच्या आकडेवारीनुसार, भारत, अमेरिका, युरोप आणि चीनमध्ये पाच वर्षांच्या कालावधीत सोने केवळ २३% ते ५०% वेळाच शेअर्सपेक्षा सरस ठरले आहे. याचा अर्थ असा की, दीर्घकाळात असेही टप्पे आले आहेत जेव्हा शेअर्सनी चढ-उतारांनंतरही सोन्यापेक्षा जास्त परतावा दिला आहे.

सोन्याची खरी ताकद ही प्रत्येक वेळी जास्त परतावा देण्यात नसून, जेव्हा बाजार कोसळतो किंवा तणावाखाली असतो, तेव्हा पोर्टफोलिओला आधार देण्यात असते. सोने पोर्टफोलिओ स्थिर ठेवण्यासाठी उपयुक्त आहे, मात्र केवळ सोन्यावर अवलंबून राहिल्यास जेव्हा शेअर बाजार पुन्हा उभारी घेतो, तेव्हा कमाईच्या मोठ्या संधी हातच्या जाऊ शकतात.

**भ्रम ३ : विविधीकरणामुळे नफा घटतो**

विविधीकरणाचे टीकाकार अनेकदा असा दावा करतात की, वेगवेगळ्या मालमत्तांमध्ये पैसे गुंतवल्यामुळे नफा विभागला जातो आणि एकूण परतावा कमी होतो. मात्र, डीएसपीच्या मल्टी-असेट विश्लेषणानुसार हा दावा चुकीचा ठरला आहे. देशांतर्गत शेअर्स, डेट (कर्जरोखे), आंतरराष्ट्रीय शेअर्स आणि सोने यांचे मिश्रण असलेला पोर्टफोलिओ केवळ शेअर्सच्या पोर्टफोलिओइतकाच परतावा देतो, पण त्यातील धोका किंवा अस्थिरता (व्होलॅटिलिटी) अत्यंत कमी असते.

भारतात गेल्या २० वर्षांत देशांतर्गत शेअर्सनी ११.७% दराने परतावा दिला, पण त्यात मोठी अस्थिरता होती. याउलट, मल्टी-असेट धोरणाने जवळपास तितकाच परतावा दिला, पण त्यातील धोका निम्म्याहून कमी होता. अमेरिकेचा अपवाद वगळता सर्व प्रमुख देशांत मल्टी-असेट पोर्टफोलिओने स्थानिक चलनात शेअर्सपेक्षा चांगली कामगिरी केली आहे.

**विकसित बाजारपेठांमधील २१ व्या शतकातील परतावा**

| देश | शेअर बाजार परतावा | सोन्याचा परतावा | अतिरिक्त परतावा |
|---|---|---|---|
| जपान | ५.४% | १३.०% | ७.६% |
| ब्रिटन | ४.९% | ११.९% | ७.१% |
| फ्रान्स | ४.२% | १०.५% | ६.३% |
| अमेरिका | ८.१% | ११.१% | ३.०% |
| कॅनडा | ८.१% | १०.९% | २.८% |
| ऑस्ट्रेलिया | ९.८% | ११.१% | १.३% |

*(स्रोत: डीएसपी म्युच्युअल फंड नेत्रा अहवाल)*

### गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाचा बोध

डीएसपी म्युच्युअल फंडच्या या अहवालाने गुंतवणुकीच्या पारंपरिक संकल्पनांमधील फोलपणा उघड केला आहे. शेअर्स नेहमीच सोन्यापेक्षा श्रेष्ठ नसतात, सोने प्रत्येक वेळी शेअर्सला मागे टाकत नाही आणि विविधीकरणामुळे परतावा कमी होत नाही. दीर्घकालीन यश हे तुम्ही कोणत्या मूल्यावर गुंतवणूक केली, बाजाराचे चक्र कसे आहे आणि तुमचा पोर्टफोलिओ किती संतुलित आहे, यावर अवलंबून असते.कोणत्याही एका कल्पनेवर किंवा कथेवर विश्वास ठेवण्यापेक्षा, अनिश्चितता लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या बाजारात टिकून राहील असा संतुलित पोर्टफोलिओ तयार करणे, हेच यशस्वी गुंतवणुकीचे गमक आहे.

## अर्थसंकल्प आणि करांबाबतच्या अपेक्षा

भारत देश केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ च्या उंबरठ्यावर उभा असताना, कर धोरणाने आता केवळ महसूल गोळा करण्याच्या पलीकडे जाऊन निश्चितता, प्रशासकीय शिस्त आणि संस्थात्मक विश्वासार्हतेकडे वळणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत करांच्या भक्कम वसुलीमुळे आणि एकूण उत्पन्नात प्रत्यक्ष करांचा वाटा निम्म्याहून अधिक असल्याने, आता अंदाजक्षमता, विवाद कमी करणे आणि प्रशासनाचा दर्जा सुधारण्याला प्राधान्य देण्यासाठी पुरेशी वित्तीय तरतूद उपलब्ध आहे.

मागील केंद्रीय अर्थसंकल्पात नवीन कर प्रणालीअंतर्गत करमुक्त उत्पन्नाची मर्यादा ७ लाख रुपयांवरून १२ लाख रुपयांपर्यंत वाढवून मोठा दिलासा देण्यात आला होता. त्यामुळे यंदा अल्प आणि मध्यम उत्पन्न गटातील करदात्यांसाठी कोणतीही मोठी सवलत जाहीर होण्याची शक्यता कमी वर्तवली जात आहे. तथापि, १ एप्रिल २०२६ पासून जुन्या १९६१ च्या कायद्याची जागा घेणाऱ्या नवीन 'प्राप्तीकर कायदा २०२५' कडे होणारे संक्रमण आणि मध्यमवर्गीयांच्या अपेक्षा हा सध्या चर्चेचा मुख्य विषय ठरत आहे. सध्याच्या उच्च कर टप्प्यांचे सुसूत्रीकरण करावे, अशी मागणी करदाते आणि तज्ज्ञांकडून सातत्याने केली जात आहे.



**अधिभार आणि भांडवली नफा करांबाबतच्या अपेक्षा**

अधिभाराच्या (सरचार्ज) टप्प्यांमध्ये वाढ करणे अपेक्षित आहे. सध्या ५० लाख रुपयांवर लागणारा अधिभार ७५ लाख रुपयांच्या मर्यादेनंतर लावावा आणि १ कोटी रुपयांची मर्यादा १.५ कोटी रुपयांपर्यंत वाढवावी, अशी मागणी आहे. त्यानुसार उच्च टप्प्यांमध्येही वाढ होणे गरजेचे आहे. याव्यतिरिक्त, सूचीबद्ध रोख्यांच्या बाबतीत दीर्घकालीन भांडवली नफ्यावरील (एलटीसीजी) कर वजावटीची मर्यादा १.२५ लाख रुपयांवरून २ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, जुन्या कर प्रणालीतील वजावटींचे चुकीचे दावे मोठ्या प्रमाणात केले जात असल्याने, सरकार जुनी कर प्रणाली पूर्णपणे किंवा अंशतः रद्द करण्याची शक्यता नाकारता येत नाही. नवीन प्रणालीतील प्रभावी कर हा वजावटीसह असलेल्या जुन्या प्रणालीपेक्षा कमी असल्याने सरकारचा कल नवीन प्रणालीकडेच राहण्याची चिन्हे आहेत.

**कॉर्पोरेट आणि उद्योगांसाठीच्या तरतुदी**

एलएलपी (मर्यादित दायित्व भागीदारी) संस्थांसाठीचे कर दर कंपन्यांच्या कर दरांशी सुसंगत असावेत, अशी उद्योगांची अपेक्षा आहे. तसेच, 'मेक इन इंडिया' उपक्रमाला चालना देण्यासाठी उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांसाठी कर दरांमध्ये कपात केली जाण्याची शक्यता आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादनाला गती मिळून गुंतवणुकीचे वातावरण अधिक पोषक होऊ शकते.

ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलती

सध्या वैयक्तिक करदात्यांसाठी जुनी आणि नवीन अशा दोन कर प्रणाल्या अस्तित्वात आहेत. जुन्या प्रणालीत अनेक वजावटी उपलब्ध असल्या तरी १० लाख रुपयांवरील उत्पन्नावर ३० टक्के इतका उच्च कर दर लागू होतो. त्या तुलनेत नवीन प्रणालीत १५ लाख रुपयांवरील उत्पन्नावर हा उच्च दर लागू होतो. ज्येष्ठ नागरिकांसाठी कर टप्प्यांमध्ये सुधारणा झाल्यास त्यांना कमी होत असलेल्या व्याजदरांच्या काळात अधिक तरलता प्राप्त होऊ शकेल. ३० टक्के या सर्वोच्च कर दरासाठीची उत्पन्नाची मर्यादा सध्याच्या २४ लाख रुपयांवरून ३५ लाख रुपयांपर्यंत वाढवली जावी, अशी एक प्रमुख मागणी जोर धरत आहे.

### प्रमाणित वजावट आणि कलम ८०-सी मधील बदल

**पगारदार कर्मचाऱ्यांसाठीची प्रमाणित वजावट (स्टँडर्ड डिडक्शन) सध्याच्या मर्यादेवरून १ लाख रुपयांपर्यंत वाढवली जाण्याची मोठी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे, कलम ८०-सी अंतर्गत मिळणाऱ्या वजावटीची मर्यादा गेल्या अनेक वर्षांपासून १.५ लाख रुपयांवर स्थिरावलेली आहे, ती ३ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची मागणी करदात्यांकडून होत आहे. जर सरकारने जुनी कर प्रणाली पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला, तर या सर्व सवलती नवीन कर प्रणालीमध्ये कशा प्रकारे सामावून घेतल्या जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. १ फेब्रुवारी २०२६ रोजी सादर होणारा हा अर्थसंकल्प मध्यमवर्गीयांना किती दिलासा देतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिले आहे.**

**पेंशन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी अर्थात पीएफआरडीए ने एनपीएस वात्सल्य योजनेसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. अल्पवयीन मुलांच्या नावाने उघडलेल्या खात्यांमधील गुंतवणूक, पैसे काढणे आणि योजनेतून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेबाबत यात स्पष्टता देण्यात आली आहे. या सुधारित नियमांमुळे पालकांना मुलांच्या दीर्घकालीन आर्थिक सुरक्षेसाठी अधिक लवचिकता मिळणार आहे.**

## 'एनपीएस वात्सल्य'बाबत नवीन नियमावली जाहीर

एनपीएस वात्सल्य अंतर्गत गुंतवणुकीसाठी पालकांना विविध पर्यायांची निवड करता येईल. यामध्ये जोखमीचे संतुलन राखण्यासाठी पीएफआरडीएने गुंतवणुकीच्या मर्यादा निश्चित केल्या आहेत: सरकारी रोखे आणि संबंधित गुंतवणूक क्षेत्रात १५ ते २० टक्के निधी गुंतवता येईल. कर्ज साधनांमध्ये १० ते ३० टक्क्यांपर्यंत वाटप शक्य आहे. अल्पकालीन कर्ज किंवा मनी मार्केट साधनांमध्ये १० टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करता येईल, मात्र यासाठी योजनेचा एकूण निधी ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. समभाग म्हणजेच इक्विटी संबंधित गुंतवणुकीत ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत सर्वाधिक वाटा ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे.

**खाते उघडण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

एनपीएस वात्सल्य खाते सुरू करण्यासाठी अल्पवयीन मुलाचा जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मॅट्रिक प्रमाणपत्र, पॅन किंवा पासपोर्ट यांपैकी कोणताही एक पुरावा आवश्यक आहे. पालकांसाठी केवायसी अंतर्गत आधार, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट किंवा मतदार ओळखपत्र यांसारखी कागदपत्रे अनिवार्य आहेत. अनिवासी भारतीय किंवा ओसीआय पालकांसाठी मुलाचे एनआरई किंवा एनआरओ बँक खाते तपशील देणे गरजेचे आहे.



**१८ वर्षांपर्यंत पैसे काढण्याचे नियम**

या योजनेतून विशिष्ट कारणांसाठीच अंशतः पैसे काढता येतील. मुलाचे शिक्षण, गंभीर आजारांवरील उपचार किंवा ७५ टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व आल्यास ही सवलत मिळेल. खाते उघडल्यापासून किमान ३ वर्षे पूर्ण झाल्यावरच ही सुविधा उपलब्ध होईल. एकूण योगदानाच्या २५ टक्के रक्कम काढता येईल आणि १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत जास्तीत जास्त दोन वेळा अशा प्रकारे पैसे काढता येतील. १८ ते २१ वयोगटात पुन्हा दोन वेळा पैसे काढण्याची सोय उपलब्ध आहे.

**योजनेतून बाहेर पडणे आणि पुढील सातत्य :** वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर खातेदाराला ही योजना पुढील ३ वर्षांसाठी सुरू ठेवता येईल. यासाठी नवीन केवायसी आणि वारसदार तपशील देणे बंधनकारक आहे. खातेदार ऑल सिटीझन मॉडेलमध्ये देखील आपले खाते वर्ग करू शकतो. योजनेतून पूर्णपणे बाहेर पडताना एकूण जमा रकमेच्या ८० टक्के रक्कम एकरकमी काढता येईल, तर उर्वरित २० टक्के रक्कम ॲन्युइटी योजनेत गुंतवावी लागेल. जर एकूण जमा रक्कम ८ लाख रुपयांपेक्षा कमी असेल, तर संपूर्ण रक्कम एकरकमी काढण्याची मुभा देण्यात आली आहे. पीएफआरडीए च्या या नवीन नियमावलीमुळे अल्पवयीन मुलांसाठीच्या पेन्शन योजनेची कार्यप्रणाली अधिक पारदर्शक आणि सक्षम होणार आहे.

## कर बचतीचा 'मास्टरस्ट्रोक'

भारतातील मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी कर नियोजनाचे एक अत्यंत प्रभावी पण दुर्लक्षित साधन म्हणजे 'हिंदू अविभक्त कुटुंब' म्हणजेच 'एचयूएफ'. प्राप्तिकर कायद्यांतर्गत याला पूर्णपणे कायदेशीर मान्यता असूनही, अनेक कुटुंबे केवळ वैयक्तिक 'पॅन' कार्डवरच सर्व आर्थिक व्यवहार करतात. मात्र, सनदी लेखापाल नितीन कौशिक यांच्या मते, ही रचना वापरून तुम्ही तुमच्या कुटुंबाचा करपात्र भार लक्षणीयरीत्या कमी करू शकता.

**एचयूएफ म्हणजे काय आणि ते कसे कार्य करते?**

प्राप्तिकर कायद्यानुसार, एचयूएफ ही त्याच्या सदस्यांपासून वेगळी एक 'स्वतंत्र व्यक्ती' मानली जाते. याचाच अर्थ, कुटुंबातील सदस्यांकडे स्वतःचे वैयक्तिक पॅन कार्ड असताना, कुटुंबाच्या नावाने एक वेगळे पॅन कार्ड काढता येते. एचयूएफ स्वतःच्या नावाने मालमत्ता खरेदी करू शकते, व्यवसाय करू शकते आणि गुंतवणूकही करू शकते.

जानेवारी २०२६ मधील नवीन नियमांनुसार, 'नवीन कर प्रणाली'मध्ये ४ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त आहे. जर तुम्ही एचयूएफ तयार केले, तर ही ४ लाखांची मर्यादा तुम्हाला वैयक्तिकरीत्या आणि तुमच्या एचयूएफला स्वतंत्रपणे मिळते. यामुळे कुटुंबाचे एकूण ८ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न कायदेशीररीत्या करमुक्त होऊ शकते.

**स्थापना आणि कायदेशीर बाजू**

एचयूएफ स्थापन करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. यासाठी एका घोषणापत्राची आवश्यकता असते, ज्यामध्ये कुटुंबाचा प्रमुख किंवा 'कर्ता' आणि इतर सदस्यांची नावे असतात.




एकदा का स्वतंत्र पॅन कार्ड आणि बँक खाते उघडले की, ही संस्था एक स्वतंत्र करदाता म्हणून कार्यरत होते. तथापि, यामध्ये काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. केवळ स्वतःचा पगार एचयूएफच्या खात्यात वळवून कर वाचवता येत नाही. उत्पन्न हे वडिलोपार्जित मालमत्ता, व्यवसाय, भेटवस्तू किंवा गुंतवणुकीतून आलेले असणे आवश्यक आहे. तसेच, वडिलांकडून मिळालेली थेट मालमत्ता आणि आजोबांकडून मिळालेली मालमत्ता यांच्यातील कायदेशीर फरक समजून घेणे गरजेचे आहे.

**कोणाला याचा सर्वाधिक फायदा होईल?**

ज्या कुटुंबांचे उत्पन्न अनेक स्रोतांतून येते, जसे की घरभाडे, व्यवसाय आणि शेअर्समधील गुंतवणूक, त्यांच्यासाठी एचयूएफ हे एका दुसऱ्या आर्थिक इंजिन प्रमाणे काम करू शकते. केवळ कर वाचवण्यासाठीच नाही, तर भावी पिढीसाठी संपत्तीचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठीही ही रचना अत्यंत उपयुक्त ठरते.

### एचयूएफ चे प्रमुख फायदे

- एचयूएफ स्थापन केल्याने केवळ स्लॅबचाच फायदा मिळतो असे नाही, तर इतर अनेक सवलतीही मिळतात:
- **स्वतंत्र वजावट:** प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८० सी अंतर्गत दीड लाख रुपयांची आणि ८० डी अंतर्गत आरोग्य विम्याची वजावट वैयक्तिक पॅनप्रमाणेच एचयूएफलाही स्वतंत्रपणे मिळते.
- **भांडवली नफ्यावर सवलत:** शेअर्स किंवा मालमत्तेच्या विक्रीतून मिळणाऱ्या दीर्घकालीन भांडवली नफ्यावर मिळणारी सवलत एचयूएफला स्वतंत्रपणे घेता येते.
- **गुंतवणुकीचे साधन:** एचयूएफ स्वतःच्या नावाने मुदत ठेवी, शेअर्स आणि म्युच्युअल फंडात गुंतवणूक करू शकते. आयपीओमध्ये अर्ज करतानाही स्वतंत्र पॅनमुळे शेअर्स मिळण्याची शक्यता वाढते.
- **वडिलोपार्जित मालमत्ता:** कुटुंबातील वडिलोपार्जित मालमत्तेतून मिळणारे भाडे किंवा उत्पन्न थेट एचयूएफच्या खात्यात दाखवून वैयक्तिक कराचा स्लॅब वाढण्यापासून रोखता येते.

# माझी मनपा सेल्फी उपक्रमाने मतदारांना घातली भुरळ

**अहिल्यानगर मनपा स्वीप समितीच्या वतीने वैशिष्ट्यपूर्ण 'वोट सेल्फी पॉईंट्स'चे प्रदर्शन; हजारो मतदान कर्मचाऱ्यांनी काढले सेल्फी**



नगर – राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार अहिल्यानगर मनपा स्वीप समितीच्या वतीने माझी मनपा सेल्फी संकल्पनेअंतर्गत सुमारे १५ वैशिष्ट्यपूर्ण सेल्फी पॉईंट्स उभारण्यात आले आहेत. मतदान कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण ठिकाणी तसेच 'स्वीपनगरी'मध्ये हे पॉईंट्स प्रदर्शित करण्यात आले आहेत.

मतदानाची तारीख असलेल्या '१५' या अंकाच्या आकाराचे सेल्फी पॉईंट्स सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. १५ तारखेला मतदानाची टक्केवारी (तीशी ढीर्पीी) वाढवा, असा संदेश देणाऱ्या या सेल्फी पॉईंट्सवर अनेकांनी उत्साहाने सेल्फी काढले. शहरातील उद्याने आणि मुख्य चौकांमध्येही हे सेल्फी पॉईंट्स लावण्यात येत आहेत.

या सेल्फी पॉईंट्सवर आपले मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी आहे, एक वोट सेल्फी तो बनता है, मैं भारत हूँ.. मैं मेरे लिये मतदान करूँगा, मी महाराष्ट्र आहे.. मी माझ्यासाठी मतदान करणार, मी अहिल्यानगर आहे... मी माझ्यासाठी मतदान करणार तसेच रिश्ते में तो हम तुम्हारे भारतीय लगते हैं.. नाम है अहिल्यानगर के मतदार, आमचं अहिल्यानगर भारी.. आमचं मत भारी.. १५ जानेवारीला आमचं मतदान पण भारी अशा आकर्षक घोषवाक्यांनी मतदारांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.

'एकी' नावाची मुंगी (मॅस्कॉट) आणि विविध भौमितिक आकारातील सेल्फी पॉईंट्स अनेकांचे लक्ष वेधून घेत होते. प्रशिक्षणाच्या दोन टप्प्यात हजारो कर्मचाऱ्यांनी येथे सेल्फी काढले. आपले नाव मतदार यादीत शोधा, आपले मतदान केंद्र शोधा, मनपा स्वीप समितीचे उपक्रम पहा व आपले सेल्फी फोटो व्हॉट्सपवर अपलोड करा अशा ४ संकल्पनांचे ४ क्यूआर कोड येथे लावण्यात आले आहेत. ८०५५८०९३९४ या अहिल्यानगर मनपाच्या 'स्वीप केअर' व्हॉट्सप क्रमांकावर आपला सेल्फी पाठवल्यास सहभागींना प्रमाणपत्र मिळणार असल्याची माहिती निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

या उपक्रमासाठी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, मेहेर लहारे, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, मतदारदूत डॉ. अमोल बागुल, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# 'लाडकी बहिण' नेमकी कोणाची? अहिल्यानगरमध्ये वादाला फोडणी



**महानगरपालिका निवडणूक २०२६**


राज्य सरकारची 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' विधानसभा निवडणुकीत गेम चेंजर ठरली. परिणामी लोकसभेचा 'जनादेश' विधानसभेला बदलला. महायुती निर्विवाद बहुमताने महाराष्ट्रात सत्तेवर आली ही ऐतिहासिक घडामोड कोणालाच दुर्लक्षित करता येणार नाही. विधानसभा निवडणुकीत लाडकी बहिण योजनेने सत्ता मिळवून दिली, तशी राजकीय किमया महानगरपालिका निवडणुकीत घडू शकते हे सत्तारूढ महायुतीला अभिप्रेत आहे. किंबहुना महायुतीकडे मतदान आकर्षित करण्याचा हुकमी पत्ता ठरतो पण त्यासाठी महायुती एकसंघ असायला हवी होती. पण अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीत महायुतीची गोची झाली. भाजप–राष्ट्रवादी युतीने तर शिवसेना (शिंदे गट) स्वतंत्र लढत आहे मग सत्तेतील महायुतीतील लाडक्या बहिणी कोणाला झुकते माप देणार हा कळीचा मुद्दा झाला आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ही योजना कार्यान्वित झाली, त्यामुळे शिवसेना (शिंदे गट) त्याचे श्रेय घेऊ इच्छिते, तसा त्यांचा प्रयत्न चालू आहे. तर सध्या मुख्यमंत्री भाजपचे फडणवीस आहे. त्यांच्या पक्षाने लाडकी बहिण योजना आपल्या बाजूने असल्याचा भासवण्याचा प्रयत्न चालवला. त्याचा प्रत्यय अहिल्यानगरच्या प्रचारातून येत आहे. तर राज्याचे अर्थमंत्री राष्ट्रवादीचे अजित पवार आहेत. तिजोरी त्यांच्या ताब्यात म्हणजे लाडक्या बहिणीला पैसे देणारी राष्ट्रवादी त्यांना हा मतदार त्यांचा वाटतो. भाजप–राष्ट्रवादी युतीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नगरमध्ये सभा झाली. त्या सभास्थळी भाजप कार्यकर्त्यांनी 'लाडक्या बहिणीचा एकच भाऊ, देवा भाऊ' अशा घोषणा दिल्या. फडणवीस यांची 'देवाभाऊ' अशी प्रतिमा तयार करुन भाजप लाडकी बहिण योजना 'हायजॅक' करू पाहत आहे. हे अहिल्यानगरप्रमाणे राज्यातही इतर ठिकाणी प्रकर्षाने पुढे येते.

या योजनेचे श्रेय घेऊ इच्छिते तसेच शिवसेना तसूभरही मागे नाही, याची प्रचिती या पक्षाच्या गांधी मैदानातील सभेतून आली. पक्षाचे नेते मंत्री गुलाबराव पाटील यांच्या सभेच्या वेळी लाडकी बहिण योजना आपल्याच नेत्याने कशी आणली, हे ठासवण्याचा आवर्जून प्रयत्न केला.

एकूणच काय तर लाडकी बहीण नेमकी कोणाची? या वादाला अहिल्यानगरमध्ये राजकीय फोडणी मिळत आहे. त्यात काँग्रेस पक्षाने या लाड्की बहिण योजनेला विरोध न करता सरकारने १४ जानेवारीला हा हप्ता देऊन आचारसंहितेचा भंग होऊ देऊ नये अशी राज्य निवडणूक आयोगाकडे मागणी नोंदवून खोडा घातला. त्यांनी १६ जानेवारीला म्हणजे मतमोजणीच्या दिवशी पैसे द्यावेत, असे सुचवले आहे. अजून निर्णय प्रलंबित आहे. लाडकी बहिण योजनेचा राजकीय केंद्रबिंदू अहिल्यानगरमध्ये निर्माण झाला आहे. 'एकच भाऊ देवाभाऊ' अशा घोषणा भाजप कार्यकर्त्यांनी देऊन राष्ट्रवादी आणि शिवसेना (शिंदे गट) या दूर ठेवण्याचा प्रयत्न अहिल्यानगरमध्ये मोठ्या प्रमाणात होत आहे त्याचा परिणाम १६ जानेवारीला मतमोजणीतून पुढे येईल, घोडा मैदान दूर नाही.

**– रामदास ढमाले**

# आनंदधाम येथे १४ जानेवारी रोजी मकर संक्रांतीला मंगलपाठ



नगर – मकर संक्रातीनिमित्त १४ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता आनंदधाम येथे मंगलपाठ आयोजित करण्यात आला आहे.

आचार्य सम्राट आनंदऋषीजी म.सा.यांचे शिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा., सेवानिष्ठ आलोकऋषीजी म.सा., गितार्थऋषीजी म.सा., स्थविरा त्रिशलाकुंवरजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., पुष्पकंवरजी म.सा., दिव्यदर्शनाजी म.सा., विश्वदर्शनाजी म.सा., उदयप्रभाजी म.सा., प्रितीदर्शनाजी म.सा., आराधनाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा., विपुलदर्शनाजी म.सा. आदी साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी आचार्य सम्राट आनंदऋषीजी म सा. यांचे ध्वनीमुद्रित मंगल पाठ होणार आहे.

कार्यक्रमास श्रावक श्राविकांनी उपस्थित रहावे व साधू साध्वीजींच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, जैन श्रावक संघाने केले आहे.

# मिशन निरंतर मिलाप अंतर्गत जवानांच्या कुटुंबीयांशी थेट संवाद

**ब्रिगेडियर पी. सुनील कुमार यांच्या हस्ते 'निरंतर मिलाप टीम'ला हिरवा झेंडा**



मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूल, अहिल्यानगरमधील माजी सैनिक, वीरनारी तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने मिशन निरंतर मिलाप १.० हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत 'निरंतर मिलाप टीम'ला ब्रिगेडियर पी. सुनील कुमार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

नगर – मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूल, अहिल्यानगरमधील माजी सैनिक, वीरनारी तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने मिशन निरंतर मिलाप १.० हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत 'निरंतर मिलाप टीम'ला ब्रिगे. पी. सुनील कुमार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

हा उपक्रम लेफ्टनंट जनरल पी. एस. शेखावत यांच्या मार्गदर्शनाखाली संकल्पित करण्यात आला असून, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांशी थेट संपर्क साधून त्यांच्या अडचणी त्यांच्या दारातच सोडविणे, हा या मिशनचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमास लेफ्टनंट कर्नल अशोक कुमार (चीफ रेकॉर्ड ऑफिसर व कमांडिंग ऑफिसर, रेकॉर्ड्स, मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंट) तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या टप्प्यातील 'निरंतर मिलाप टीम'मध्ये एक ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर, दोन नॉन कमिशन्ड ऑफिसर्स तसेच मेकॅनाइज्ड इन्फंट्री बटालियनचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. ही टीम केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक या दक्षिण भारतातील पाच राज्यांतील १४ जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन माजी सैनिक, वीरनारी व शहीद जवानांच्या कुटुंबीयांशी संवाद साधणार आहे. त्यांच्या तक्रारी, निवृत्तीवेतन, वैद्यकीय सुविधा, कल्याणकारी योजना आदी विषयांवर जागेवरच मार्गदर्शन करून समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे रेजिमेंट व तिच्या माजी जवानांच्या कुटुंबीयांमधील भावनिक नाते अधिक दृढ होणार असून, त्यांच्या समस्या समजून घेत सन्मान, संवेदना व तत्परतेने मदत करण्याची भावना अधिक बळकट होणार आहे.

'मिशन निरंतर मिलाप' हा उपक्रम केवळ प्रशासकीयच नव्हे तर मानवी दृष्टिकोनातून राबविण्यात येत असून, देशासाठी सेवा बजावलेल्या जवानांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी रेजिमेंट खंबीरपणे उभी आहे, हा संदेश यातून दिला जात आहे.

# तलवार घेऊन फिरणाऱ्या तरूणाला पोलिसांनी पकडले

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रस्ता ते सपकाळ चौकादरम्यानच्या परिसरात तलवार घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका तरूणास तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे. रोहित रामचंद्र पोनिया (वय ३१, रा. डॉन बॉस्को कॉलनी, सावेडी, मुळ रा. हनुमान मंदिराजवळ, गजराजनगर) असे त्या तरूणाचे नाव आहे.

सदर प्रकरणी त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ जानेवारीला सायंकाळी पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांना माहिती मिळाली की, गुलमोहर रस्ता ते सपकाळ चौकादरम्यान एका लिंबाच्या झाडाजवळ एक इसम कंबरेला तलवारसारखे हत्यार बाळगून फिरत आहे. त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले. या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, अंमलदार दिनेश मोरे, अब्दुलकादर इनामदार, भागवत बांगर, सतीश त्रिभुवन यांनी दोन पंचांसह घटनास्थळी छापा टाकला. रोहित पोनिया याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे तलवार आढळून आली.












# ज्ञानेश्वरीतील ८३ वैशिष्ट्ये अंगिकारल्यास मुले स्वंयप्रकाशाने चमकतील

**शिक्षणतज्ञ व लेखिका सौ. रेणूताई दांडेकर यांचे प्रतिपादन, ज्ञानसंपदा व्याख्यानमाला दुसरे पुष्प**



ज्ञानसंपदा स्कूल आयोजित १५ व्या ज्ञानसंपदा व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शिक्षणतज्ञ व लेखिका सौ. रेणूताई दांडेकर यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर गुंफले. त्यांचा सन्मान करताना संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, विचार भारतीचे रविंद्र मुळे आदी. (छाया – उदय जोशी)

नगर – ज्ञानसाधना, निर्णयक्षमता, सहनशीलता, संयमशीलता, रागावर नियंत्रण, संवादपध्दती, भाषेचा अभिमान अशी ८३ वैशिष्ट्ये ज्ञानेश्वरांनी व्यक्तिमत्व विकासाची सांगितली आहेत. याकरीता कुठल्याही क्लास जायची गरज नाही हे आपल्याकडे आहे देवाची व्याख्या संत ज्ञानेश्वर करतात समोर येणारा प्रत्येक सजीव देव आहे अशी ८३ वैशिष्ट्ये ज्ञानेश्वरीत आहेत की जी शाळेने किंवा कोणी घेतली त्यांच्या ओव्या, उदाहरण आहेत ही अंगिकारल्यास सगळी मुले स्वंयप्रकाशाने चमकतील अशी माझी खात्री आहे, असे प्रतिपादन शिक्षणतज्ञ व लेखिका सौ. रेणूताई दांडेकर यांनी केले.

ज्ञानसंपदा स्कूल आयोजित १५ व्या ज्ञानसंपदा व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शिक्षणतज्ञ व लेखिका सौ. रेणूताई दांडेकर यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर गुंफले. मानद संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, विचार भारतीचे रविंद्र मुळे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

रेणुताई दांडेकर पुढे म्हणाल्या की,ज्या प्रमाणे मूर्ती घडवताना जसे मूर्तीकार नको असलेला भाग काढतो मूर्तीत भावना निर्माण करतो. मूर्तीमध्ये आत्मतत्व असते. मूर्तीतील प्राणतत्व महत्वाचे आहे त्याप्रमाणेच आपण आपल्यात बदल केला पाहीजे कोणत्याही मोठया माणसानी व्यक्तिमत्व विकासाचा कोर्स केला नव्हता तरी त्यांच्याकडे पाहून आपण प्रेरणा घेणे व आपल्याला माणूस म्हणून घडविणे. मुलांचा व्यक्तिमत्व विकास करण्याची पहिली जबाबदारी आईवडीलांची. मुलांवर चांगले संस्कार करणे दुसऱ्याचे गुणतत्व शोधणे व ती आपल्यात आणणे ही व्यक्तिमत्वाची एक महत्वाची बाजू असते.

धावणे, अभ्यास यांचा सराव करतो अभ्यासात सराव व लक्षात ठेवणे महत्वाचे आहे अभ्यास पुस्तकापुरता न राहता त्याव्यतिरिक्त आपल्याला प्रश्न पडले पाहीजे त्यांचा शोध घेता आले पाहीजे व्यक्तिमत्व विकासात अभ्यास, करूणा, दया, जिज्ञासू वृत्ती, निर्णयक्षमता, आत्मविश्वास, आत्मनिभरता हे सर्व गुण महत्वाचे आहेत. विविध प्रात्यक्षिके घेउन अभ्यास कसा करावा यांचा मंत्रही त्यांना मुलांना दिला. यावेळी त्यांनी विविध खेळ घेतले त्यात मुलांनी सहभागी होत अभ्यासाचे पैलू समजून घेतले.

पालक मुलांना प्रत्येक गोष्ट देतो परंतू एखादी गोष्ट नाही मिळाल्यास अश्यावेळेस संयम पाळला पाहीजे. विद्यार्थ्यांनी नाही ऐकण्याची सवय केली पाहीजे आज आपण भौतिक साधनात आनंद शोधतो मुलांकडून अपेक्षेचे नियोजन केले पाहीजे मुलांना ज्यात आवड तेच करू दया.स्वत: स्वत:मधून स्वतंत्र विचार करणे. दुसऱ्याला काहीतरी देण्याची वृत्ती जोपासा. सकात्मकता गोष्टीचा अंगीकारा.

प्रथमत विद्यार्थ्यांनी सरस्वती वंदना सादर केली. इ. १० वी ची विद्यार्थीनी अपूर्वा सचिन हुलावळे हिला शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ चा बेस्ट आऊट गोइंग स्टुडन्ट पुरस्कार रेणूताईंच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक सौ. मुक्ता दिवेकर यांनी केले.

सुत्रसंचालन श्रीमती स्वाती तवले यांनी केले. पाहुण्याचा परीचय भाग्यश्री जाधव यांनी करून दिला. प्रसाद बर्वे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलींद गंधे, मानद सचिव अरूण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, विश्वस्त श्रीहरी टिपुगुडे, सुमित सोनवणे, रविंद्र मुळे आदी उपस्थित होते.


**CHANGE IN NAME**

My old name was SONALI MARUTI EDAKE and my new name is SONAL MARUTI EDAKE. Both names are mine, but I use my name as SONAL MARUTI EDAKE.

**CHANGE IN NAME**

My old name was SUNANDA NAWNATH DHUMAL and my new name is SUNANDA NAVNATH DHUMAL Both names are mine, but I use my name as SUNANDA NAVNATH DHUMAL.


# राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताबसाठी १७ जानेवारीला जिल्हा संघ निवड चाचणी

नगर – महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने लवकरच वरिष्ठ गट गादी व माती राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी आणि ग्रीको रोमन महाराष्ट्र केसरी २०२५–२६ चे आयोजन केले जाणार आहे. या स्पर्धांसाठी अहिल्यानगर जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी श्रीगोंदा तालुका कुस्तीगीर संघला देण्यात आली आहे. संघ निवड स्पर्धा १७ जानेवारी रोजी श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळीत येथे होणार आहे. स्पर्धेचे नियोजन पै. वैभव सुपेकर हे करीत आहेत, अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी दिली.

सदर स्पर्धेसाठी एकूण ३० वजन गट असतील त्यामध्ये फ्रि स्टाईल माती विभागात १० वजन गट, फ्रि स्टाईल गाडी विभागात १० वजन गट आणि ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात १० वजन गट असतील. जास्तीत जास्त पात्र कुस्तीगिरांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ व खजिनदार पै. शिवाजी चव्हाण यांनी केले.

याप्रसंगी जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष महाराष्ट्र केसरी पै. अशोक शिर्के, उपाध्यक्ष पै. अर्जुन शेळके, महाराष्ट्र केसरी पै. गुलाब बर्डे, उपाध्यक्ष पै. रवींद्र वाघ, सह सचिव पै. प्रवीण घुले, कार्यालयीन सचिव निलेश मदने, उप महाराष्ट्र केसरी पै. बापूसाहेब थेटे, उप महाराष्ट्र केसरी पै. बबन काशीद, पै. शिवाजी कराळे, उत्तर महाराष्ट्र केसरी पै. युवराज करंजुले, पै. पांडुरंग गुंजाळ, पै. उमेश भागानगरे, पै. अतुल कावळे, पै. प्रमोद गोडसे, पै. धनंजय खर्से, पै. शंकर खोसे, पै. संदीप कावरे आदी उपस्थित होते.

# पोल्ट्री व्यावसायिकाला मारहाण करत जिवे मारण्याची धमकी

नगर: जुन्या व्यवहाराच्या कारणावरून पोल्ट्री व्यावसायिकाला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची आली तसेच जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना पाईपलाईन रोड परिसरात १० जानेवारी रोजी दुपारी घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शेख वसिम अजमोद्दीन (रा.तपोवन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा पोल्ट्रीचा व्यवसाय असून, त्यांचा आरोपी निखिल नामदेव हराळे याच्यासोबत कोंबड्यांच्या खरेदी–विक्रीवरून व्यवहार झाला होता. याच व्यवहारातून त्यांच्यात वाद निर्माण झाला होता. वसिम यांनी या प्रकरणी न्यायालयात दाद मागितली होती. याचाच राग मनात धरून निखिल हराळे आणि त्याच्यासोबत असलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी वसिम यांना गाठले. तू आमच्यावर न्यायालयात केस का केली? ती केस त्वरित मागे घे, असे म्हणत आरोपींनी त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. हा वाद विकोपाला गेल्यावर आरोपींनी वसिम यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच ही केस मागे न घेतल्यास जिवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेनंतर वसिम यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी निखिल हराळे व इतर तीन साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(२) आणि ३५२ नुसार गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करत आहेत.

